नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्र दिन
हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी

"सह्याद्रीचा सिंह गर्जतो,
शिवशंभू राजा..
दरीदरीतून नाद गुंजला,
महाराष्ट्र माझा..
जय जय महाराष्ट्र माझा...
महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!"

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ०१ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## सूचना

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

महाराष्ट्र दिनानिमित्त 'दैनिक समर्थ गांवकरी' कार्यालयास शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी सुट्टी असल्याने शनिवार, दि. २ मे २०२६ रोजी चा अंक प्रसिध्द होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

# राज्यात १ मेपासून जनगणना मोहीम

## १ ते १५ मे दरम्यान ऑनलाईन माहिती भरण्याची संधी

### १६ मेपासून घरोघरी नोंदणी; दुसऱ्या टप्प्यात जातनिहाय लोकसंख्या गणना

मुंबई : (स. गांवकरी)



महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत राज्यात १ मेपासून जनगणना मोहीम राबविण्यात येणार आहे. दोन टप्प्यात राबविल्या जाणाऱ्या या मोहिमेत, प्रथम घरगणना केली जाणार असून कुटुंबाकडे उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधांची नोंद ३३ प्रश्नांच्या माध्यमातून केली जाणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना होणार असून ती प्रक्रिया फेब्रुवारी, २०२७ मध्ये राबविली जाणार आहे. त्यात जातिनिहाय माहितीही संकलित केली जाणार आहे. या माहिती संकलनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.


पहिल्या टप्प्यात घरांची स्थिती, कुटुंबास उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा आणि मालमत्ता यांची माहिती संकलित केली जाईल. राज्याच्या मुख्य जनगणना अधिकारी डॉ. निरूपमा डांगे यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत राज्यातील जनगणना मोहिमेची माहिती दिली. नागरिकांनी जनगणना मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून माहिती घेण्याकरिता येणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. जनगणना संचालनाचे उपमहानिबंधक ए. एन. राजीव व यशवंत पाटील यावेळी उपस्थित होते.

पूर्णपणे डिजिटल माध्यमातून २०२७ ची जनगणना केली जाणार आहे. यात ॲपच्या माध्यमातून नागरिकांना प्रथमच आपली माहिती (स्वगणना) भरता येईल. यात केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या ३३ विषयांशी संबंधित माहिती भरावी लागेल. एकूण १४ भाषांमध्ये ही माहिती भरता येईल. हा पर्याय ऐच्छिक असून यात सुधारणा करण्याची संधी असेल. ही प्रक्रिया १ ते १५ मे दरम्यान राबविली जाणार आहे. या माहितीच्या व्यवस्थापनासाठी http://se.census.gov.in हे संकेतस्थळ कार्यरत असेल. माहिती अवघ्या १५ ते २० मिनिटात भरता येईल. तसेच, स्वगणनेदरम्यान ॲप किंवा संकेतस्थळावर कोणतीही कागदपत्रे अपलोड करण्याची गरज नाही, असे उपसंचालक संतोष पायस यांनी सांगितले.

त्यानंतर १५ मे ते १४ जून दरम्यान प्रगणक घरोघरी जाऊन नोंदविलेल्या माहितीची पडताळणी करतील. तसेच ज्यांनी ऑनलाईन माहिती भरलेली नाही, त्यांची नव्याने नोंदणी करून माहिती भरतील. सर्व महिती सुरक्षित सर्व्हरवर संग्रहित केली जाणार आहे. माहिती गोपनीय राहवी याकरिता कठोर सायबर सुरक्षा लागू करण्यात आली आहे, अशी माहिती डॉ. डांगे यांनी दिली. महाराष्ट्राबरोबरच दिल्ली, राजस्थान, मेघालय, झारखंड या राज्यांतील जनगणना मोहिम १ मेपासून सुरू होत आहे. इतर राज्ये त्याच्या सोयीने पुढील १५ दिवसात मोहीम सुरू करतील. तब्बल १५ वर्षांनी होणाऱ्या या जनगणनेत बदलांचे चित्र जनगणनेतील प्रश्नावलीत उमटलेले दिसते. उदाहणार्थ दूरध्वनीबरोबरच भ्रमणध्वनी, स्मार्ट फोट, लॅपटॉप, इंटरनेट उपलब्धता, एलपीजी-पीएनजी जोडणी अशा काही प्रश्नांचा यात समावेश करण्यात आला आहे. तसेच, प्रश्नावलीत कुटुंबात सेवन केले जाणारे मुख्य धान्य कोणते, असा एक प्रश्न आहे. पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत कोणता, प्रकाशाचा मुख्य स्त्रोत त्यात रॉकेल, सौरऊर्जा, इतर तेल असा प्रश्न आहे. शौचालयाचा प्रकार कोणता. त्यात फ्लश आहे का, लादीसह खड्डा आहे की नाही, असे विचित्र प्रश्न विचारण्यात आले आहेत. जनगणनेकरिता प्रामुख्याने शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना ॲपवरील नोंदणीकरिता स्वतचा भ्रमणध्वनी वापरावा लागणार आहे. त्यांना स्वतंत्र गॅझेट दिले जाणार नसल्याने ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही, त्यांनी माहिती कशी घ्यायची, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

# बारावीच्या निकालाची तारीख ठरली, यावर्षी लवकर निकाल

पुणे : (स. गांवकरी)



- १५ लाख ३२ हजार विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली
- नऊ विभागीय मंडळांचा निकाल एकाच वेळी प्रसिद्ध होणार

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) बारावीच्या परीक्षेचा निकाल शनिवारी (2 मे) जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे बारावीच्या परीक्षेच्या निकालाकडे डोळे लावून बसलेल्या पालक, विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. गेल्या वर्षी राज्य मंडळाने बारावीचा निकाल ५ मे रोजी जाहीर केला होता. त्यामुळे यंदा राज्य मंडळाकडून थोडा लवकरच निकाल जाहीर केला जाणार आहे. राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी या बाबत अधिकृत परिपत्रकाद्वारे माहिती दिली. राज्य पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत घेण्यात आली. या परीक्षेसाठी १० हजार ६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा परीक्षार्थ्यांची संख्या २७ हजारांनी वाढली होती. यंदाच्यापरीक्षेसाठी नोदणी केलेल्या १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख २० हजार २२९ मुले, ७ लाख १२ हजार २४० मुली, तर १८ तृतीयपंथी विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यात कला शाखेचे ३ लाख ८० हजार ६९२, वाणिज्य शाखेचे ३ लाख २० हजार १५२, विज्ञान शाखेचे ७ लाख ९९ हजार ७७३, व्यावसायिक अभ्यासक्रमाचे २७ हजार ३७८, तर आयटीआयचे ४ हजार ४९२ विद्यार्थी समाविष्ट होते. राज्य मंडळाने यंदा परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या होत्या. त्यात परीक्षेसाठी सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही लावणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, राज्यातील १७२ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही नसल्याने या केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबद करण्यात आली होती. तसेच २७१ भरारी पथकांसह परीक्षा केंद्रांवर पोलिस बंदोबस्त, बैठी पथके अशा विविध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. राज्य मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, बारावीच्या परीक्षेचा निकाल शनिवारी दुपारी एक वाजता जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना हा निकाल mahresult.nic.in, hscresult.mkcl.org, आणि mahahsscboard.in या संकेतस्थळांवर ऑनलाइन पाहता येणार आहे.

## थोडक्यात...



### भोंदूबाबा खरात प्रकरण दोन पोलीस अधिकाऱ्यांना भोवले

मुंबई (स. गांवकरी) : महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला राज्याच्या पोलीस प्रशासनात मोठे फेरबदल करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून भारतीय पोलीस सेवा आणि राज्य पोलीस सेवेतील तब्बल २१ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. जालना पोलीस अधिक्षक अजय बन्सल यांच्याकडे सायबर सुरक्षा अधिक्षक पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर अमरावतीच्या ग्रामीण पोलीस अधिक्षक सिंगुरी विशाल आनंद यांची धुळे पोलीस अधिक्षकपदी, नाशिक ग्रामीण पोलीस अधिक्षक बाबासाहेब पाटील यांची मुंबईत उपायुक्तपदी बदली करण्यात आली आहे. अहिल्यानगरचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांची पोलिस महासंचालक कार्यालयत तर रविंद्रसिंह परदेशी यांची राज्य गुप्तवार्ता विभागात उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. संदीप घुगे यांची मुंबईत उपायुक्तपदी, श्रवण दत्त यांची अप्पर पोलीस महासंचालक(विशेष कृती), मुम्मका सुदर्शन यांची अहिल्यानगर पोलीस अधिक्षकपदी बदली करण्यात आली आहे. नाशिक ग्रामीण पोलीस अधिक्षकपदी धोंडोपंत स्वामी, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्य अधिक्षकपदी अनुज तारे यांची तर अनुराग जैन यांची मुंबईत उपायुक्तपदी, नंदूरबार पोलीस अधिक्षकपदी अश्विनी सानप यांची बदली करण्यात आली आहे.

# मुम्मका सुदर्शन अहिल्यानगरचे नवे 'एसपी'

## सोमनाथ घार्गे यांची बदली

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोमनाथ घार्गे यांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची नाराजी भोवल्याचे मानले जाते. जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांची २३ मे २०२५ रोजी अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली. वर्षभराचा कालावधी त्यांच्यासाठी संमिश्र राहिला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी शिर्डी येथील कार्यक्रमात आर्थिक घोटाळ्यांच्या गुन्ह्यांचा तपास तसेच पोलिसांच्या कार्यपद्धतीबद्दल जाहीररित्या नाराजी व्यक्त केली होती. त्यापूर्वी सिस्पे व इतर कंपन्यांचे आर्थिक घोटाळे गाजले. या गुन्ह्यांचा तपासही संथ गतीने झाला. घार्गे यांच्या कालावधीत सर्वात प्रमुख घटना घडली, ती जप्त केलेल्या अमली पदार्थांना पोलीस मुख्यालयातून पाय फुटल्याची घटना. या घटनेने जिल्हा पोलीस दलाच्या प्रतिमेला धक्का बसला होता. घार्गे यांची मुंबईत पोलीस महासंचालक कार्यालयात सहाय्यक पोलीस महानिरीक्षक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांच्या जागी नियुक्त करण्यात आलेले मुम्मका सुदर्शन हे चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होते. ते मूळचे आंध्र प्रदेशातील व २०१६ च्या तुकडीचे अधिकारी आहेत. तत्पूर्वी त्यांनी प्राप्तीकर निरीक्षक म्हणूनही काम पाहिलेले आहे. भारतीय पोलीस प्रशासन सेवेत प्रवेश केल्यानंतर त्यांनी परभणी येथे अतिरिक्त अधीक्षक, नागपूर येथे उपायुक्त (गुन्हे) या पदावर काम केले आहे. धाडसी अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे.



# मुंबईत ४५ वर्षीय व्यक्तीने कुत्र्यावर केले लैंगिक अत्याचार

(स. गांवकरी)



मुंबईत एका ४५ वर्षीय इसमाने एका पाळीव कुत्र्यावर लैंगिक अत्याचार केले. या घटनेनंतर त्याला अटक करण्यात आली. मुंबईतल्या मालाड पश्चिम भागात ही घटना घडली. २६ एप्रिलच्या दिवशी रुखसाना शेख नावाच्या महिलेने तिचं पेट क्लिनिक सोडलं आणि ती बाहेर आली. तेव्हा तिने घडलेला प्रकार पाहिला जे पाहून तिला धक्का बसला. ज्यानंतर तिने या प्रकरणात आवाज उठवला आणि या माणसाविरोधात तक्रार दाखल केली.

रुखसाना ही एका पेट क्लिनिकमध्ये काम करते. तिने जेव्हा तिच्या क्लिनिकबाहेर एका माणसाला कुत्र्यावर लैंगिक अत्याचार करताना पाहिलं तेव्हा ती त्याच्यावर ओरडली. कुत्र्याला आधी सोड असं तिने सांगितलं. ज्यावर तो इसम तिच्यावरच ओरडला आणि तिला सांगितलं की हे काय तुझ्या मालकीचं कुत्रं नाही. ज्यानंतर रुखसानाने हेल्पलाइनला फोन केला आणि ते लोक तिथे आले. त्यांनी नरेश चांदूलकर नावाच्या या माणसाला अटक केली. मुक्या जनावरांवर अत्याचार प्रतिबंधक कायदा १९६० अन्वये त्या इसमाला अटक करण्यात आली. शॅडो नावाच्या कुत्र्यावर या नरेश चांदूलकरने अत्याचार केले. शॅडो या कुत्र्यावर उपचार करण्यात येत आहेत. शॅडो हा मालाड पश्चिम भागात असलेल्या डेअरी मालकाचा कुत्रा आहे अशी माहितीही समोर आली आहे. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे.

Psychology Today मध्ये प्रकाशित झालेल्या माहितीनुसार जे लोक अशा प्रकारे प्राण्यांवर लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार करतात, त्यांना असं काहीतरी करण्याबाबत थ्रील असतं. शिवाय विशिष्ट प्राण्यांबाबतच ते असं कृत्य करतात. अभ्यासकांनी असंही म्हटलं आहे की अनेक लोक पॉर्न पाहतात, त्यावरुन त्यांच्या मनात प्राण्यांचा लैंगिक छळ करण्याची विकृत इच्छा निर्माण होते. अशा गुन्ह्यांमध्ये अटक झालेल्या गुन्हेगारांपैकी एक तृतीयांश लोकांनी पॉर्न पाहून हे केल्याचं म्हटलं होतं.अशा विकृतांनी लहान मुलांवर तसंच प्राण्यांवर अत्याचार केले होते.


भारतीय दंड संहिता कलम ३७७ हे प्राण्यांवरील अत्याचार, लैंगिक छळ याबाबत वापरले जात होतं. या कलमांनुसार आरोपी दोषी ठरल्यास १० वर्षे तुरुंगवास किंवा जन्मठेप अशा शिक्षांची तरतूद होती. १ जुलै २०१४ रोजी भारतीय न्यायसंहिता लागू झाली आहे. त्यात ३७७ कलम रद्द करण्यात आलं आहे. शिवाय त्याऐवजी जे कलम आहे त्यात प्राण्यांवरच्या लैंगिक अत्याचारांबाबत शिक्षेची तरतूद स्पष्ट करण्यात आलेली नाही. भारतीय न्याय संहितेत कलम ३२५ आहे. हे कलम प्राण्यांना इजा पोहचवणं किंवा त्यांचा लैंगिक छळ करणं याच्याशी संबंधित आहे. पोलीस या कलमाचा आधार घेऊन PCA अंतर्गत कारवाई करु शकतात.

### भारतात अशा घटना यापूर्वी घडल्या आहेत का?

- PETA या मुक्या प्राण्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेने दिलेल्या माहितीनुसार जुलै २०२४ पासून अशा ४० घटना समोर आला आहे.
- या घटनांमध्ये गायी, कुत्रे, बकऱ्या, घोडे यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याच्या घटनांचा समावेश आहेत.
- मुंबईत जानेवारी २०२६ मध्ये २० वर्षांच्या एका तरुणाने कांदिवली या ठिकाणी कुत्रीवर लैंगिक अत्याचार केले होते.
- तसंच एका ४० वर्षीय माणासाने कांदिवली या ठिकाणी एका कुत्रीवर अत्याचार केले होते अशीही घटना समोर आली होती.
- याच घटनांप्रमाणे हैदराबाद, कोलकाता, भुवनेश्वर, कोईंबतूर या ठिकाणीही अशा घटना घडल्या आहेत अशी माहिती पेटाने दिली आहे.

# मतमोजणीपूर्वीच बंगालमध्ये हायव्होल्टेज ड्रामा!

## "ईव्हीएमशी छेडछाड होतेय", आरोप करत टीएमसी नेत्यांचे स्ट्रॉंग रूमबाहेर आंदोलन



(स. गांवकरी)

मतदान होण्यापूर्वी, मतदान सुरु असताना विविध कारणांनी चर्चेत असणारी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक आता मतदानाच्या नंतर देखील वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. भाजप आणि निवडणूक आयोगाचे अधिकारी संबंधित पक्षांच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीत मतपेट्या उघडण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप आता तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी केला आहे. टीएमसी नेत्यांनी नेताजी इनडोअर स्टेडियमबाहेरील स्ट्रॉंग रूमच्या बाहेर धरणे आंदोलनास सुरुवात केली आहे. टीएमसी नेते शशी पांजा आणि कुणाल घोष स्ट्रॉंग रूमच्या बाहेर आंदोलनला बसले आहेत. आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू आणि पुद्दुचेरी या पाच राज्यात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी येत्या ०४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले असताना आता पश्चिम बंगालमध्ये मतपेट्या उघडण्याचा प्रयत्न केल्या आरोप टीएमसीकडून करण्यात आला आहे. टीएमसी नेते आंदोलन करत असताना भाजप कार्यकर्तेही स्ट्रॉंग रूमबाहेर दाखल झाले. भाजप नेते तापस रॉय यांनी, "टीएमसी केवळ अफवा पसरवत आहेत, ते पराभवाची तयारी करत आहेत," अशा शब्दात टीका केली. तृणमूल काँग्रेसचे नेते कुणाल घोष यांनी गैरप्रकार होत असल्याचा आरोप करत आयोगाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. "निवडणूक आयोगाच्या लाईव्हस्ट्रीमिंग आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये तुम्ही पाहू शकता की काही लोक आत काम करत आहेत. आमचा एकही प्रतिनिधी आत नाही. ते आम्हाला आत जाऊ देत नाहीत. ते आम्हाला इतर उमेदवारांशी बोलायला सांगत आहेत. आम्ही इतर उमेदवारांची जबाबदारी का घ्यावी?", असा सवाल घोष यांनी उपस्थित केला. दिवसाढवळ्या लोकशाहीची हत्या होत असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसने केला. तृणमूलने याबाबत एक्सवर पोस्ट करुन नाराजी व्यक्त केली. "भाजपा आणि निवडणूक आयोग मिळून, संबंधित पक्षाच्या सदस्याच्या अनुपस्थित मतपेट्या उघडल्या जात आहेत. हा उघड उघड धोका आहे. पण बंगाल म्हणजे महाराष्ट्र, दिल्ली किंवा बिहार नाही. आम्ही गप्प बसून लोकशाहीची लूटमार होताना पाहणार नाही", अशी पोस्ट तृणमूल काँग्रेसने केली आहे.

### निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

टीएमसी नेत्यांच्या धरणे आंदोलनानंतर, निवडणूक आयोगाने एक निवेदन जारी केले आहे. "कुगुडीराम अनुशीलन केंद्रामध्ये सात वातानुकूलित स्ट्रॉंग रूम आहेत. मतदान संपल्यानंतर, उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी आणि सामान्य निरीक्षकांच्या उपस्थितीत या सर्व स्ट्रॉंग रूम पूर्णपणे बंद करून सील करण्यात आल्या. शेवटची स्ट्रॉंग रूम पहाटे अंदाजे ५:१५ वाजता बंद करण्यात आली. ईव्हीएम असलेल्या सर्व स्ट्रॉंग रूम सील करण्यात आल्या आहेत," असे सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओबाबत स्पष्टीकरण दिले आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी !MHT CET परीक्षांच्या तारखा जाहीर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सीईटी परीक्षेच्या दुसऱ्या संधीच्या तारखा जाहीर केल्या आहे. आता ही परीक्षा ९ ते २१ मे यादरम्यान होणार आहे. त्यामुळे सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही महत्त्वाची बातमी आहे. ही प्रवेश परीक्षा दिल्यानंतरच तुम्हाला उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळतो. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (MBA), मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (MMS),अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी शिक्षण या अभ्यासक्रमांसाठी सीईटी परीक्षा जाहीर झाली आहे. ही परीक्षा ९ मे ते २१ मे या कालावधीत होणार आहे. या परीक्षेला एकूण ४ लाख ९२ हजार ३८३ विद्यार्थी बसणार आहेत. पहिल्या संधीच्या सीईटीसठी ८ लाख ६ हजार २३६ विद्यार्थ्यांनी नोंद केली. त्यापैकी ८ लाख ३३ हजार ४८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. त्यानंतर आता दुसऱ्या संधीच्या परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. राष्ट्रीय स्तरावर दोन परीक्षा घेतल्या जातात. त्याच पार्श्वभूमीवर राज्यातदेखील दोन संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना एक परीक्षा देणे अनिवार्य आहे. मात्र, दुसरी परीक्षा द्यायची की नाही हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी ठरवायचे आहे. दरम्यान, दोन्ही परीक्षा दिल्यावर ज्यात जास्त टक्के मिळणार तो निकाल ग्राह्य धरला जाणार आहे.

### नगर शहरातील सावेडी परीसरातील नंदनवन कॉलनीत घरफोडी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील सावेडी भागातील पाईपलाईन रोडवरील नंदनवन कॉलनीत बंद घर फोडून चोरट्यांनी ८० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. यामध्ये ३० हजार रुपयांची रोख रक्कम आणि ५० हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असा ऐवज चोरीला गेला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी साहिल श्रीराम पवार हे आपल्या कुटुंबासह पुणे येथे एका कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांचे घर बंद असल्याचे पाहून चोरट्यांनी मुख्य दरवाजाचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटाचे लॉकर तोडून चोरट्यांनी ५ ग्रॅम व ७ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दोन अंगठ्या, २५० ग्रॅम वजनाचे चांदीचे बिस्कीट आणि ३० हजार रुपयांची रोकड असा एकूण ८० हजार रुपयांचा माल चोरून नेला. शेजाऱ्यांनी दरवाजा उघडा असल्याचे पाहिल्यानंतर ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी फिंगरप्रिंट तज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण करून तपास केला. याप्रकरणी साहिल पवार यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पोलीस हवालदार गणेश साठे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. सावेडी उपनगरातील वाढत्या घरफोडीच्या सत्रामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### बालसंस्कार शिबिराचे आयोजन

नारायणगाव (स. गांवकरी) : पारुंडे (वैष्णवधाम) येथील गुरुवर्य वैकुंठवासी कोंडाजी बाबा डेरे वारकरी शिक्षण संस्थेत गेल्या पाच वर्षांपासून मुलं आणि मुलींसाठी अध्यात्मिक व शैक्षणिक निवासी बालसंस्कार शिबिराचे आयोजन केले जात असते. यावर्षी हे शिबीर 27 एप्रिलपासून पुढील 12 दिवस हे शिबीर चालणार असल्याची माहिती संस्थेचे व्यवस्थापक शंकर पवार यांनी दिली. या शिबिरात ह. भ.प सारिका पवार,डॉ. प्रा. मंगल डोंगरे, डॉ.दिलीप कचेरे, डॉ.मोहम्मद जाफरी, स्वप्निल महाराज दातखिळे, डॉ. एफ. बी. आतार, मेघनाथ जाधव यांच्याकडून विविध विषयांवर मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच ह भ प पोपट महाराज खंडागळे यांच्या समारोपाच्या दिवशी प्रवचन होणार आहे. तसेच योग विषयी प्रा. एकनाथ डोंगरे, मल्हारी चव्हाण,सुनील पवार, रमेश महाराज ढोमसे, वैशाली बिडवई, शीतल पवार हे मार्गदर्शन करणार आहेत. हे शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा.एकनाथ डोंगरे, रोटरी ऑफ जुन्नर शिवनेरीचे शिरीष जठार, उद्योजक बाळासाहेब खिलारी, शंकर साळुंके, सुभाष बोकरीया, संतोष रासने, धनंजय राजूरकर यांचे सहकार्य लाभणार आहे.

### नेवासा कृषी कार्यालयाचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर; टाळे ठोकण्याचा इशारा

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा कृषी कार्यालयात वाढलेल्या भ्रष्टाचारा विरोधात आक्रमक भूमिका घेत आज नेवासा कॉँग्रेस पक्षाकडून तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयास टाळे ठोकण्याचे निवेदन देण्यात आले. नेवासा कृषी कार्यालयात मोठा भ्रष्टाचार माजला असून याबाबत तालुक्यातील शेतकऱ्यामध्ये चर्चा असून शेतकऱ्यामध्ये संताप देखील आहे. यामध्ये कार्यालयातील कर्मचाऱ्याकडून शेती औजारे, कांदा चाळ, ट्रॅक्टर, शेततळे अस्तरीकरण असेल या साठीच्या मंजुरीसाठी कृषी कार्यालयाकडून लागणाऱ्या पूर्वसंमतीसाठी मोठी रक्कम घूस स्वरूपात शेतकऱ्याकडून घेतली जाते, अनेकवेळा उघड फोन पेवर देखील अशा रकमा घेण्यात आल्या आहे. या स्वरूपात मोठा भ्रष्टाचार तालुका कृषी कार्यालयाकडून करण्यात आला आहे. यात कर्मचारी व अधिकारी देखील सहभागी आहेत अधिकाऱ्याच्या वरद हस्ताने हा धंदा चालत आहे असा आरोप कॉँग्रेस पक्षाकडून व शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे. याशिवाय तालुका कृषी कार्यालयास राज्य सरकारकडून दुरुस्तीसाठी मिळालेल्या लाखो रुपयाच्या निधीतून देखील मोठा अपहार झाल्याची देखील चर्चा आहे. दुरुस्तीच्या नावाखाली बोगस बिले काढून निधीचा अपहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. निधीतुन कोणती कामे केली यांच्या बिलाच्या पावत्यासह विवरण कॉँग्रेस पक्षांकडून मागविण्यात आले आहे.

### नारायणगाव : रोजगार मेळाव्याचे आयोजन



नारायणगाव (स. गांवकरी) : राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान व ग्रामपंचायत नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन शनिवार दि. 2 मे 2026 रोजी सकाळी 9 वाजता मुक्ताई समाज मंदिर, नारायणगाव येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होणार असून पुणे जिल्ह्यातील 10 वी 12 वी उत्तीर्ण / सर्व शाखांच्या पदवीधर उमेदवारांच्या तिथेच मुलाखती घेऊन त्यांना 50 पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.तरी जर कोणाला या रोजगाराचा फायदा घ्यायचा असेल त्यांनी धनेशभाऊ वारुळे (मो. 9665662707),जालिंदर खैरे (मो.9970797901),राजेश वारुळे (मो.9665422551),अझर शेख (मो.9527434642) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन नारायणगावचे उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी केले आहे.

# चांदेकसारे येथे ४ मे रोजी विराट हिंदू संमेलन

## नानजीभाई ठक्कर व डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या अन्नदानातून विराट हिंदू संमेलनाला बळ; चांदेकसारे येथे ४ मे रोजी भव्य आयोजन!

### विविध धर्मगुरूंची उपस्थिती, महाप्रसादाचे आयोजन!

चांदेकसारे : (स. गांवकरी)

सकल हिंदू समाजाच्या वतीने "विराट हिंदू संमेलन" या भव्य धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन सोमवार, दिनांक ४ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. हा कार्यक्रम भैरवनाथ जोगेश्वरी मंदिरासमोरील हिंदू सूर्य महाराणा प्रताप उद्यान, चांदेकसारे (ता. कोपरगाव) येथे संपन्न होणार आहे.

या संमेलनासाठी विविध संत-महंत, प्रवचनकार व धर्मगुरूंची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमानिमित्त उपस्थित भाविकांसाठी महाप्रसाद व अन्नदानाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. हे अन्नदान थोर समाजसेवक नानजीभाई खीमजीभाई ठक्कर ठाणावाला, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तसेच दै. समर्थ गांवकरी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे.

याच पार्श्वभूमीवर संमेलनासाठी आवश्यक अन्नधान्य साहित्य सुपूर्द करण्यात आले. यावेळी तांदूळ, लापशी व गूळ यांसह अन्नदानासाठी लागणारा साहित्याचा माल आयोजकांकडे देण्यात आला. साहित्य सुपूर्द करताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, संगमनेर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक महेश पडतानी, गोपाल शेठ पडतानी, अक्षय रंगनाथ झाल्टे, सुभाष आहेर, मेजर शांतीलाल होन, किशोर पवार, कल्याण होन, विलास होन, ह.भ.प. कविताताई साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.



डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी, पत्रकार, प्रतिनिधी तसेच हिंदू बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. "समर्थ भारत, सशक्त हिंदू" या संकल्पनेला बळ देणारे हे संमेलन धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक ऐक्याचा संदेश देणारे ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# घाटमार्गावर दोन वेगवेगळे अपघात; कंटेनर पलटी

डांग:गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सापुतारा ते शामगहान जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील सापुतारा–मालेगाव घाटमार्गावर आज दोन वेगवेगळे अपघात घडले. दोन्ही अपघातांत वाहनांचे मोठे नुकसान झाले असले तरी सुदैवाने दोन्ही चालक बचावले. पहिल्या अपघातात, महाराष्ट्रातील डिंडोरी–गुंडगाव येथून प्लास्टिक दाण्यांचा माल घेऊन राजस्थानकडे जात असलेल्या कंटेनर (क्रमांक RJ-01-CD-0553) च्या चालकाने स्टेअरिंगवरील नियंत्रण गमावले. त्यामुळे कंटेनर मालेगाव घाटमार्गावर रस्त्याच्या कडेला बांधकाम सुरू असलेल्या संरक्षण भिंतीवर चढून पलटी झाला. या अपघातात कंटेनरमधील प्लास्टिक दाणे रस्त्यावर विखुरले गेले आणि वाहनाचे मोठे नुकसान झाले. दुसऱ्या अपघातात, मालेगाव फॉरेस्ट रेस्ट हाऊसजवळील वळणावर महाराष्ट्रातून केमिकल घेऊन सूरतकडे येणारा टँकर ब्रेक फेल झाल्याने अनियंत्रित झाला. टँकरने रस्त्याच्या कडेला सुरू असलेल्या संरक्षण भिंतीच्या कामातील लोखंडी सळया ओलांडून खोल दरीत कोसळला. सुदैवाने या अपघातातही चालक बचावला. सापुतारा–मालेगाव घाटमार्गावर सतत वळणे, चढ-उतार तसेच सध्या सुरू असलेली रस्त्याची दुरुस्ती आणि संरक्षण भिंतीचे काम यामुळे वाहनचालकांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. स्थानिक नागरिकांकडून या मार्गावर जड वाहनांसाठी अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# लिंकिंगची सक्ती फार्मर आयडी खतांच्या किमतीत झपाट्याने वाढ

## शेतकरी बेजार : के के गांगुर्डे कॉँग्रेस तालुकाध्यक्ष यांचा आरोप

- खतांवरच्या सर्व अटी शर्ती रुद्ध करा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू : के के गांगुर्डे

(स. गांवकरी)

रासायनिक खतांच्या प्रचंड वाढत्या किमती सक्तीची लिंकिंग फार्मर आयडीच्या अटीमुळे शेतकरी अधिकाधिक संकटात सापडले आहे केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे थेट फटका शेतकरी राजाला बसत असल्याचा आरोप कांग्रेसचे कळवण तालुका अध्यक्ष के के गांगुर्डे यांनी केला. शेतकऱ्यांना होत असलेला आणि दिवसेंदिवस वाढत चाललेल्या खताच्या किंमतीत झपाट्याने वाढ होत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना सुलभ पद्धतीने खत उपलब्ध करून द्यावे अशी मागणी यावेळी कांग्रेश अध्यक्ष के के गांगुर्डे यांनी केली आहे.



खरीप हंगामाच्या तोंडावर असतांना सरकारने बळीराजाला दिलासा देण्याऐवजी आणखी नवनवीन अटी लादल्या आहेत. वाढीव दर केल्याने शेतकरी मोठा कोंडीत सापडला आहे. असे गांगुर्डे यांनी सांगितले तर दोन वर्षांआधी सुमारे अकराशे रुपयाला मिळणारी खताची गोनी आता दोन हजारांच्या वर पोहोचली आहे. सगळ्याच प्रकारच्या खतांच्या किमतीत झपाट्याने वाढ झाली आहे. त्यातच शेतीचा उत्पादन खर्च दुपटीने वाढला आहे. त्यात मजुरी बियाणे औषधें वीज पाणी खर्च आधीच आवाच्या सव्वा वाढला आहे. दुसरीकडे पहावं तर शेतमालाला योग्य तो सरकार हमीभाव देत नाही. त्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे दिवसेदिवस आत्महतेचा प्रमाण वाढत आहे फार्मर आयडी सक्तीमुळे अनेक शेतकऱ्यांना खत खरेदी करणे अडचणी ठरत आहे ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांना ऑनलाइन प्रक्रिया माहिती नाही तर काही शेतकऱ्यांना तांत्रिक अडथळ्यामुळे नोंदणी करता येत नाही त्यामुळे कधी कधी दुकानदार आणि शेतकऱ्यांमध्ये झटापट पहायला मिळते यात दोघांनाही मनस्ताप सहन करावा लागतो. सरकारने तातडीने खतांच्या वाढत्या भावावर लगाम घालावी फार्मर आयडी प्रक्रिया सोपी करावी लिंकिंग ची सक्ती रद्द करावी शेतकऱ्यांना अगदी सुलभ पद्धतीने बळीराजासाठी करावे असेही यावेळी के के गांगुर्डे म्हणाले अन्यथा कॉँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून मोठ्या प्रमाणात तीव्र आंदोलन असा सज्जड इशारा त्यांनी दिला आहे.

# ज्येष्ठांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

निंभोरे पाटील परिवारातील ज्येष्ठ नागरिकांचा अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. मातृ-पितृ ऋणाची जाणीव ठेवत ६१ वर्षांनंतर अशा प्रकारचे सोहळे आयोजित करण्याची परंपरा जपली जात असून, या माध्यमातून ज्येष्ठांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा संदेश देण्यात आला.

या सोहळ्यात सौ. कांताबाई व दादासाहेब निंभोरे, सौ. सुलोचनाबाई व आप्पासाहेब निंभोरे, सौ. सुमतिबाई व आदरसिंग निंभोरे, सौ. लताबाई व भास्करराव निंभोरे, सौ. आशाबाई व लालासाहेब निंभोरे, तसेच सौ. सिंधुबाई संभाजी राजेभोसले, ग.भा. हिराबाई सदाशिव जठार, सौ. द्वारकाबाई सर्जेराव मोरे, सौ. पुष्पाबाई चंद्रकांत गायकवाड आणि सौ. कमलबाई अंबादास राजेभोसले या परिवारातील ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. आयुष्यभर कुटुंबासाठी योगदान देणाऱ्या या ज्येष्ठांचा त्यांच्या समक्ष सन्मान होत असल्याने वातावरण भावूक झाले.



कार्यक्रमात प्रमुख प्रवचनकार ह.भ.प. घनश्याम आण्णा शेलार यांनी आपल्या प्रवचनातून पालकसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. "आई-वडिलांची सेवा हेच खरे तीर्थ आहे. त्यांच्या सेवेसाठी आयुष्य अर्पण केले तरी ते कमीच आहे," असे सांगत त्यांनी उपस्थितांना संस्कारांची जाणीव करून दिली. भक्त पुंडलिकाच्या सेवेमुळेच भगवान पांडुरंग पंढरपूर येथे येऊन उभे राहिले, या उदाहरणाद्वारे त्यांनी पालकसेवेचे महत्त्व स्पष्ट केले.

तसेच कुक्कुट ऋषींचा संदर्भ देत त्यांनी नीतिमूल्यांवर भर दिला. "बहुमत हे नेहमी सत्य नसते, परंतु नीती ही कायम सत्य असते," असे सांगत समाजाने योग्य मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेशजी डांगे (तंटामुक्ती अध्यक्ष) यांनी केले, तर प्रास्ताविक प्रकाशजी निंभोरे (खरेदी-विक्री संघ संचालक) यांनी केले. यावेळी दिनकरजी काका पंदरकर (जि.प. सदस्य), संतोषराजे भोसले, महेश देशमुख (सरपंच), नितीन आण्णा डुबल (कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक), बाबासाहेब बारगुजे (माजी सरपंच), हेमंत सर नलगे (माजी जि.प. सदस्य), महेंद्रजी गायकवाड, मोहनजी भिंताडे तसेच ह.भ.प. एकनाथ निंभोरे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी जालिंदर निंभोरे (उद्योजक व कुकडी कारखाना संचालक) यांनी आभार मानले. या सोहळ्यास निंभोरे परिवारातील सदस्य, नातेवाईक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा केवळ सन्मानाचा नव्हे, तर कुटुंबातील एकोपा, संस्कार आणि परंपरेचा सुंदर संगम ठरला.

# ठाणे प्रिमियर लीगचा बिगुल १ मे रोजी वाजणार

ठाणे : (स. गांवकरी)

लेदर क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी टीपीएल नावाने प्रसिद्ध असणारी क्रिकेट स्पर्धा ठाण्यात रंगणार आहे. महाराष्ट्र माझा सेवा संस्थेतर्फे युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने, मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या संलग्नतेने १ ते ८ मे दरम्यान ठाणे प्रिमियर लीग २०२६ आयोजन दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे करण्यात आले आहे. लीगचे यंदा १४ वे वर्ष असून आयपीएल आणि रणजी करंडक स्पर्धेतून खेळलेले क्रिकेटपटू लीगमध्ये खेळणार असल्याने ठाणेकरांना रंगतदार लढती पहायला मिळणार असल्याचे मुंबई क्रिकेट असोसिएशनचे ॲपेक्स कौन्सिल मेंबर, महाराष्ट्र माझा सेवा संस्थेचे सल्लागार विकास रेपाळे यांनी सांगितले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ




दिवस रंगणाऱ्या या लीगमध्ये ठाणे जिल्ह्यातील १६ संघांचा सहभाग असणार आहे. या संघामधून आयपीएल खेळलेले अथर्व अंकोलेकर, अखिल हेरवाडकर, साईराज पाटील, हार्दिक तामोरे, धुमिल मटकर, दिव्यांश सक्सेना, रॉयस्टन डायस, प्रग्नेश कानपिल्लेवार, प्रवीण तांबे हे क्रिकेटपटू खेळणार आहेत. स्पर्धे दरम्यान एकूण चार लाख रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार असून सर्वोत्तम फलंदाज, क्षेत्ररक्षक, गोलंदाज आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूस गौरवचिन्ह आणि रोख बक्षिस देण्यात येणार आहे.

# अभविपचा कार्यकर्ता ते भाजपचा आमदार

### असा थक्क करणारा प्रवास

जामखेड तालुका : (स. गांवकरी)

नान्नज गावचे सुपुत्र सुनील कर्जतकर. यांना भाजप तर्फे विधान परिषद सदस्य होण्यासाठी उमेदवारी दिली आहे. उमेदवारी म्हणजे जवळपास आमदार झाले सारखेच आहे.. सुनिल कर्जदार हे मध्यम वर्गीय कुटुंबात जन्मले. कुठलीही राजकीय पंरमपरा नाही.. विचारावर निष्ठा.. नेत्यांवर निष्ठा. अथक परिश्रम. समर्पित भावनेने संघटनेचे काम.. या बळावर कर्जतकर हे इथपर्यंत आले. त्यांचा हा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे..

७०चया दशकात ते पूणे शिक्षणाच्या निमित्ताने आले. येथे ते अभविप चे काम करू लागले. सन १९७५ साली ते पुणे शहर अभविप चे सरचिटणीस म्हणून काम पहात होते.. दरम्यान आणीबाणी जाहीर झाली. या काळात त्यांना १५ महिने कारावास झाला होता. नंतर ते मुळ नान्नज या गावी राहण्यास आले. आधुनिक पध्दतीने शेती केली. द्राक्ष बागायतदार शेतकरी म्हणून प्रसिद्ध झाले. अनेकशेतकरांना त्यांनी या कडे वळवले नान्नज हा परिसर द्राक्ष उत्पादक भाग म्हणून ओळखला जाऊ लागला होता.. याच दरम्यान १९८० साली भाजप चे काम सुरू केले. या आगोदर ते जनता पक्ष. नागंरधारी.. या पक्षाचे काम करत होते. १९८० डिसेंबर मध्ये नान्नज या लहान गावात भाजपची शाखा स्थापन केली. खेडे गावी या पक्षाचे काम सुरू केले होते. ते एक दिव्यच होते. दतात्रय राऊत. राम सिंग परदेशी. रोहिदास जोकरे. देविदास कोळपकर. गणपत मोहळकर. कृष्णा किंबहुने. अशोक गादिया. पोपट मोहळकर. आदींना बरोबर घेऊन भाजपचे काम सुरू केले. दतात्रय राऊत हे नान्नज गाव शाखेचे पहिले अध्यक्ष म्हणून निवडले गेले. सुनिल कर्जतकरांचया मार्गदर्शनाखाली भाजपची वाटचाल सुरू झाली.. सन१९९५ साली नान्नज गावची ग्रामपंचायत निवडणूकीत १७ पैकी १४ भाजपचे सदस्य निवडून आले होते. येथुन पुढे तालुक्यातील इतर गावात भाजपचे कामदेव वाढले.. सुनिल कर्जतकर हे अहिल्यानगर जिल्ह्याचे युवक आघाडी चे जिल्हा अध्यक्ष झाले.. परखड वक्ता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली होती. धाडसी नेतृत्व म्हणून तालुका व जिल्ह्यात ओळख झाली होती.. सन १९९८ साली ते नाशिक विभागाचे भाजपचे प्रभारी झाले. त्या नंतर पश्चिम महाराष्ट्र चे प्रभारी झाले. संघटन कौशल्य. वक्तृत्व कला. या जोरावर त्यांनी पक्षाचे काम वाढवले. अनेक जनांना पक्षात प्रवेश दिला. पक्षाचा विस्तार केला.. हे काम श्रेष्ठींनी पाहीलयावर त्यांना मुंबई प्रांत चे प्रभारी केले गेले. कामाच्या चढत्या आलेखा मुळे पक्षाने त्यांची महाराष्ट्र राज्य भाजप च्या प्रांत उपाध्यक्ष पदी निवड केली होती..



सुनील कर्जतकर हे संघाचे स्वयम सेवक आहेत.

विचारवर निष्ठा.. श्रेष्ठी बदल अढळ निष्ठा. अथक परिश्रम. अथक प्रवास.. संघटन कौशल्य. वकृतव. या बळावर पक्षाने त्यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. आणि त्यांनी पन्नास वर्षे पक्षाचे निष्ठेने काम केले त्याची कदर पक्ष श्रेष्ठींनी केली आहे. विधान परिषद सदस्य होण्यासाठी उमेदवारी दिली आहे. दिं. १२/५!२६ रोजी निवडणूक होणार आहे. मतदान होईलच असे नाही. बिनविरोध ही निवडणूक होऊ शकते.. काहीही झाले तरी पक्षाने उमेदवारी दिलेले उमेदवार ही शंभर टक्के निवडुन येणारच आहेत. म्हणजे सुनील कर्जतकर. या नावामागे.. आमदार.. ही मानाची उपाधी लागणार आहे. नान्नज परिसर. जामखेड तालुका. कर्जत तालुक्यातील पदाधिकारी. कार्यकर्ते यांनी फटाकयाची आतश बाजी करून आनंद व्यक्त केला. एखमेकांन पेढे भरवुन आनंद साजरा केला. सर्व सामान्य कुटूंबातील व्यक्ती आमदार होते. ही किमया फक्त भाजप पक्षातच होते. म्हणून हा पक्ष ४५ वर्षांत पूर्ण भारत देशात विस्तारला.. जगात एक नंबरचा पक्ष म्हणून उदयास आला आहे. कर्जतकरांचे सर्व स्थरातून अभिनंदन होत आहे. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नूतन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर

किनवट (स. गांवकरी) : रेणुकादेवी सहकारी शिक्षक पतसंस्था मर्या, किनवट/माहूरची नूतन कार्यकारिणी निवड आज बुधवारी पार पडली. ए.आर. कार्यालयाचे निवडणूक अधिकारी जाधव यांनी अध्यक्षपदी रवि गोपालराव नेम्मानिवार यांची निवड झाल्याची घोषणा केली. त्यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत उपाध्यक्षपदी जमादार सत्यनारायण किशनराव यांची, तर सचिवपदी पवार रमेश बाबाराव यांची सर्व संचालकांच्या बहुमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेवेळी शिक्षक नेते नरसिंग एंड्रलवार, संतोष दासरवार, शिवराज मुंडे, गजानन निलकंठवार, संतोष गोरठेकर, वाडगुरे, गोरठेकर तसेच संचालक संदिप तम्मडवार, सदानंद अचकुलवार, उमेश कोटरंगे, मारोती नागरगोजे, संतोष बंपलवार उपस्थित होते. याशिवाय अमोल उत्तरवार, प्रफुल्ल बनवसकर यांसह अनेक शिक्षकांनीही उपस्थिती लावली. पतसंस्थेचे कामकाज पाहणारे अविनाश दुर्गपुरोहीत यांनी संपूर्ण निवड प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.




### शस्त्रक्रियांचा विक्रम; सह्याद्रि हॉस्पिटलमुळे न्यूरोसर्जरीचे नवे केंद्र

पुणे (स. गांवकरी) : सह्याद्रि हॉस्पिटलने न्यूरोसर्जरी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत गेल्या पाच वर्षांत ७५० हून अधिक मायक्रोव्हॅस्क्युलर डिकंप्रेशन (एमव्हीडी) शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. मेंदूच्या नसांवरील दबावामुळे होणाऱ्या ट्रायजेमिनल न्यूराल्जिया, ग्लोसोफॅरिजियल न्यूराल्जिया आणि हेमिफेशियल स्पॅझमसारख्या गंभीर आजारांवर ही शस्त्रक्रिया प्रभावी ठरत असून, अनेक रुग्णांना वेदनामुक्त जीवन मिळाले आहे. रुग्णालयाच्या न्यूरोसर्जरी विभागाने मागील २२ वर्षांत सुमारे २,७०० पेक्षा अधिक एमव्हीडी शस्त्रक्रिया केल्या आहेत. प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. जयदेव पंचवाघ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमध्ये विशेष प्राविण्य मिळवले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी वैद्यकीय टीमच्या जोरावर सह्याद्रि हॉस्पिटलने या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.रुग्णालयात देशभरातून तसेच परदेशातूनही रुग्ण उपचारासाठी येत असल्याचे सांगण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर एमव्हीडी शस्त्रक्रिया मोजक्या प्रगत केंद्रांमध्येच केली जाते, मात्र सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये दरवर्षी होणाऱ्या अशा शस्त्रक्रियांचे प्रमाण जागतिक सरासरीपेक्षा जास्त असल्याचा दावा करण्यात आला आहे. डॉ. पंचवाघ यांनी सांगितले की, “ट्रायजेमिनल न्यूराल्जियासारख्या आजारांवर सुरुवातीला औषधोपचार केले जातात; मात्र योग्य वेळी शस्त्रक्रियेचा पर्याय निवडणे गरजेचे असते. रुग्णाची प्रकृती, आजाराचे स्वरूप आणि योग्य वेळ या सर्व बाबी लक्षात घेऊन उपचार केले जातात.” रुग्णालयाने काही आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्याचेही नमूद केले. मानेजवळील महत्त्वाच्या मज्जातंतूजवळील गाठ काढण्याची शस्त्रक्रिया आणि मेंदूतील मोठ्या गाठीवर केलेल्या यशस्वी उपचारांमुळे रुग्णांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली असून, काही रुग्णांनी अल्पावधीतच दैनंदिन आयुष्य पुन्हा सुरू केले आहे. या यशस्वी कामगिरीमुळे पुणे शहर मेंदू व मज्जासंस्थेच्या आजारांवरील अत्याधुनिक उपचारांचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### पाणीटंचाईची गंभीर समस्या

ठाणे (स. गांवकरी) : शहापूर तालुक्यासह लोकसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. विशेषतःठ गेल्या काही दिवसांपासून गाव, खेडी आणि पाड्यांमध्ये टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या. तसेच मुरबाड व भिवंडी ग्रामीण तालुक्यातील काही भागातही सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कलेक्टर कार्यालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषद, बृहन्मुंबई महानगरपालिका, पाणीपुरवठा विभाग तसेच संबंधित सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. बैठकीत टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

**अकोले पोलीस स्टेशन**

ता. अकोले जि. अहिल्यानगर
दुरध्वनी क्र. ०२४२४-२२१३३३,
ई मेल - p.s.akole.anr@mahapolice.gov.in
अकोले पोलीस स्टेशन

जावक क्र. -/२०२६ अकोले दि. ०१/०५/२०२६

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अकोले पोलीस स्टेशन आवारात मागील काही वर्षांपासुन विविध कंपन्यांच्या मोटार सायकल, चारचाकी वाहने व ट्रक सारखी वाहने अभिलेखावरील गुन्हयांतील तसेच बेवारस जप्त वाहने पडुन आहेत, सदर मोटार सायकल, चारचाकी वाहने व ट्रक सारखी वाहने ताब्यात घेण्यासाठी कोणीही मालक अद्याप पावेतो आलेले नाही.

तरी ज्या नागरिकांची मोटार सायकल, चारचाकी वाहने व ट्रक सारखी वाहने ही अकोले पोलीस स्टेशन येथे जमा आहेत किंवा पडुन आहेत त्यांनी आपआपल्या वाहनाचे नोंदणी दस्तऐवज (कागदपत्र) समक्ष दाखवुन संपर्क साधावा. त्याबाबत अधिकृत खात्री करुन व नोंदणी पडताळणी याची पुढील ०७ दिवसांत दि. ०७/०५/२०२६ सकाळी १०.०० वाजता. खात्री करुन आपली वाहने घेवुन जावे, दिलेल्या ०७ दिवसांचे मुदतीत आपले वाहन खात्री करुन घेवुन न गेल्यास त्याचा नियमाप्रमाणे लिलाव करुन पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सविनय सादर
पोलीस निरिक्षक
अकोले पोलीस स्टेशन
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

# बच्चू कडूंच्या पक्षप्रवेशावर जनतेची नाराजी

(स. गांवकरी)

महाराष्ट्रातील विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांच्या नव्या पक्षप्रवेशामुळे राज्यातील दिव्यांग,शेतकरी आणि कष्टकरी वर्गामधुन पक्ष प्रवेशाच्या स्वागता ऐवजी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सामाजिक चळवळींतून उदयास आलेले आणि सर्वसामान्यांचे नेते म्हणून ओळख निर्माण केलेल्या कडू यांच्या या राजकीय निर्णयावर अनेक स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत. गेल्या काही वर्षांत दिव्यांगांच्या हक्कांसाठी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आणि कष्टकरी वर्गाच्या न्यायासाठी आक्रमक भुमिका घेणारे नेते म्हणुन कडू यांची प्रतिमा होती.मात्र,नव्या पक्षात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या भूमिकेत बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात




आहे.त्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिव्यांग संघटनांनी याबाबत नाराजी व्यक्त करताना सांगितले की,आमच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढणारा नेता आता सत्तेच्या राजकारणात अडकला तर आमचे प्रश्न मागे पडतील.शेतकरी संघटनांनीही या निर्णयावर टीका करताना सांगितले की,शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने आवाज उठवणाऱ्या नेतृत्वाकडून वेगळ्या अपेक्षा होत्या. दरम्यान,कष्टकरी वर्गातील कामगारांनीही या निर्णयावर असमाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या मते,सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे नेतृत्व जर राजकीय तडजोडी करत असेल,तर आमचा विश्वास डळमळीत होतो. राजकीय विश्लेषकांच्या मते,विधानपरिषद निवडणुकीच्या तोंडावर झालेला हा पक्षप्रवेश आगामी राजकीय समीकरणांवर परिणाम करू शकतो.तसेच, कडू यांच्या पारंपरिक मतदारांमध्ये निर्माण झालेली नाराजी निवडणुकीत महत्त्वाची ठरू शकते.

या सर्व घडामोडींवर अद्याप बच्चू कडू यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिलेली नसली,तरी लवकरच ते आपली भूमिका स्पष्ट करतील,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्यातील राजकीय वातावरण तापत असताना, या मुद्द्याचा पुढील काळात काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**सोशल मिडियावर बच्चु कडू ट्रोल**

सध्या बच्चू कडू यांच्यावर होत असलेले ट्रोलिंग हे केवळ सोशल मीडिया प्रतिक्रिया नसुन त्यांच्या राजकीय निर्णयांवर जनतेत निर्माण झालेल्या नाराजीचे प्रतिबिंब मानले जात आहे.आगामी निवडणुकांमध्ये या नाराजीचा किती परिणाम होतो,हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## विद्यार्थिनीचा विनयभंग; टाकेदच्या शिक्षकावर गुन्हा

सर्वतिर्थ टाकेद : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्यातील सर्वतीर्थ टाकेद येथील न्यू इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता ८ वी च्या विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. याच शाळेच्या इयत्ता १३ वर्षीय बालिकेवरील लैंगिग अत्याचार प्रकरणी मुख्याध्यापकाला जन्मठेप आणि वर्गशिक्षकाला ६ महिने कारावासाची शिक्षा सुनावली असतांना ही घटना घडल्याने शिक्षक घाबरत नाहीत असे दिसते. याप्रकरणी विद्यार्थिनीच्या फिर्यादीवरून घोटी पोलीस ठाण्यात शिक्षकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक माहिती अशी, मंगळवारी सर्वतीर्थ टाकेद येथील न्यु इंग्लीश स्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये पिडीत विद्यार्थिनी भावासोबत कागदपत्रांवर मुख्याध्यापकाचे सही शिक्के आणण्यासाठी गेली होती. या शाळेचा शिक्षक अर्जुन गभाजी हरिश्चंद्रे याने विद्यार्थिनीला मुख्याध्यापक बैठकीत असल्याने मी सही शिक्के घेऊन देतो. तिच्या भावाला शाळेच्या बाहेर उभे करून तिला शाळेच्या कक्षात नेले. यानंतर या शिक्षकाने विद्यार्थिनीला लज्जा उत्पन्न होईल असे हावभाव केले. अश्लील भाषा वापरून तु सातवीला असतांना तुझी छाती लहान होती. पण आता तु आठवीला असून तुझी छाती आता किती मोठी झाली आहे असे बोलत तिची छाती दाबण्याचा प्रयत्न केला. या प्रकाराने विद्यार्थिनी घाबरून तिथून निघून गेली. विद्यार्थीनीचे पालक बाहेरगावी गेलेले होते. पालक घरी आल्यावर रडत असलेली मुलगी पाहून त्यांनी विचारपूस केली. यावेळी तिने पालकांना सर्व प्रकार विषद केला. आज सकाळी पालकांनी ग्रामस्थांसह तात्काळ शाळा गाठत शिक्षक अर्जुन हरिश्चंद्रेला जाब विचारला असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

## सचिन गायकवाड यांची 'ड्रेसकोड' कादंबरी प्रकाशित

### रातंजन - मिरजगाव परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव !

कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत तालुक्यातील रातंजन येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध लेखक सचिन गायकवाड लिखित 'ड्रेस कोड' या कादंबरी पुस्तकाचे दिल्ली येथे जंतर - मंतर या ठिकाणी प्रकाशित करण्यात आली आहे.

ही 'ड्रेस कोड' कादंबरी बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक मच्छिंद्र सकटे सर व माजी मंत्री रमेश बागवे यांचे सुपुत्र अविनाशजी बागवे यांच्या हस्ते आणि पुष्पालता सकटे, बहुजन समता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव सकट यांच्यासह राज्यभरातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत दिल्लीत प्रकाशित करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी राज्यभरातील कार्यकर्ते, प्रमुख मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. चालू सामाजिक परिस्थिती आणि त्यामध्ये चुकीच्या निर्णयामुळे



भरडलेली जाणाऱ्या स्त्रिया त्यामुळे उद्ध्वस्त होणारे कौटुंबिक व्यवस्था या विषयांवर तब्बल १२० पाने असलेली ही कादंबरी लिहिण्यासाठी कर्जत तालुक्यातील कायम दुष्काळी असलेल्या ग्रामीण भागातील ध्येयवेडया लेखक सचिन गायकवाड यांना दीड वर्षाचा कालावधी गेला आहे. ग्रामीण भागातील लेखक ही संकल्पना महाराष्ट्राच्या मातीतील जिद्द, संघर्ष आणि स्वप्नपूर्तीच्या कथांशी जोडलेली आहे. ग्रामीण भागातील अनेक लेखकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वतःची ध्येय गाठले आहे. आणि आपल्या लेखणीतून समाजाला प्रेरणा दिली आहे. याचा प्रत्यय प्रत्यक्षात लेखक गायकवाड यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लिहिलेल्या 'ड्रेसकोड' या कादंबरीतून येतो. त्यांनी यापूर्वी 'सावली' ही कादंबरीच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि विद्यार्थ्यांची सध्याची परिस्थिती यावर लिखाण केलेले आहे. लिहिले असून त्याचे देखील यापूर्वी प्रकाशन केले गेले आहे.

लेखक सचिन गायकवाड यांच्या दिल्लीत प्रकाशित कादंबरीबद्दल त्यांच्यावर मिरजगाव, रातंजन परिसरातील ग्रामस्थांकडून व विविध क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## अवैध रित्या रेती उपसा प्रकरणी २५ लाख २५ हजार रुपये मुद्देमाल जप्त

**पाच जणा विरुद्ध गुन्हा दाखल**

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

गोदावरी नदीपात्रातील मौजे गंगाबेट परिसरात नांदेड ग्रामीण पोलीसांनी अवैध रेती उपसा करणाऱ्या ठिकानांवर छापा कारवाई करून एकुण २५, लाख २५, हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असून या प्रकरणी ग्रामिण पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक नांदेड अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणाऱ्या लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे.

या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. नांदेड ग्रामीण यांचे आदेशाने दिनांक २८ एप्रिल रोजी वरील अधिकारी अंमलदार ग्रामिण पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना ३. १० वाजता गोपनीय माहिती मिळाली की, मौजे गंगाबेट परीसरातील गोदावरी नदीपात्रात इंजीन व तराफेच्या साहयाने अवैध रेती उपसा करूण साठवणूक होत आहे अशा माहीती वरून वरील अधिकारी व अंमलदार यांनी मौ. गंगाबेट हद्दीतील गोदावरी नदीपात्रात वेळ अंदाजे ३.५० वाजता छापा करवाई केली असता नदी पात्रातुन, ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या मोजे गंगाबेट परिसरात अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्या साहित्य पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड व कर्मचारी यांनी तराफे व अन्य साहित्य जाळुन नष्ट केले व ईतर साहित्य जप्त केले. तराफे व इंजीनच्या सहयाने रेती काढणारे अनोळखी पाच आरोपी पोलीसांना पाहुन पळून गेले, सदर नदी पात्रात मिळून आलेले वरील नमुद तराफे



व इंजीन घेवून येणे शक्य नसल्याने जागीच पंचा समक्ष जाळून तोडुन नाश केले व नदी किनारी साठवून ठेवलेली रेती पंचासमक्ष जप्त करून खाजगी वाहनाने पो. स्टे.ला आनून जमा केली आहे.

वरील अनोळखी पाच आरोपी विरूध्द कलम ३०३( २), ३( ५) भा. न्या. सं, सहकलम ४८ ( ७), ४८( ८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५, सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

## नांदेड शहरात भव्य मिरवणूक आतिषबाजी

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचावेत, यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खा. समीर भुजबळ, आ. पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भीडेवाडा येथे सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेचा भिडेवाडा चित्ररथाचे नांदेड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात येणार आहे. शुक्रवार, दि. १ मे रोजी सकाळी १० वाजता जगतज्योती बसवेश्वर महाराज पुतळा नांदेड येथे





या चित्ररथाचे आगमण होणार आहे. याप्रसंगी समता परिषदेचे नांदेड ग्रामीण दक्षिण जिल्हाध्यक्ष नारायण अंबुरे व शहर जिल्हाध्यक्ष अॅड. संघरत्न गायकवाड व पदाधिकारी, कार्यकर्ते हे सदरील भिडेवाडा भारतातील पहिली मुलींची शाळा या चित्ररथाचे आगमण झाल्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी करणार आहेत.

## एसजीजीएस आयईटी, नांदेडमध्ये ‘संकल्प २.०’ आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

शाश्वत पर्यावरण, स्वच्छ ऊर्जा आणि हरित तंत्रज्ञानाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकत श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था (एसजीजीएस आयईटी), नांदेड येथे ‘संकल्प २.०’ अंतर्गत ‘Advances in Engineering and Science for Sustainable Environment and Energy (AESSEE-2026)’ ही दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद दि. २३ व २४ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडली. देश-विदेशातील संशोधक, प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे ही परिषद ज्ञान, संशोधन आणि नवोन्मेषाचा संगम ठरली. रासायनिक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आयोजित या परिषदेत पर्यावरण संवर्धन, ऊर्जा




कार्यक्षमता, कार्बन उत्सर्जन नियंत्रण, हरित प्रक्रिया तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. संशोधन आणि उद्योग यांच्यातील दुवा मजबूत करण्यासाठी हे व्यासपीठ विशेष उपयुक्त ठरले.

परिषदेचे उद्घाटन दि. २३ एप्रिल रोजी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे कुलगुरू डॉ. व्ही. एस. सपकाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. जयांद्र अहिरे यांनी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकारे होते. यावेळी परिषद संयोजक व विभागप्रमुख डॉ. प्रकाश जाधव, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. अभिजित व्ही. नांदेडकर, संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. ए. बी. गोंडे तसेच विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वागतपर भाषणात डॉ. प्रकाश जाधव यांनी परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि उद्योग–शैक्षणिक सहकार्याची गरज अधोरेखित केली. प्रमुख पाहुणे डॉ. सपकाळ यांनी शाश्वत विकास ही प्रत्येक अभियंत्याची जबाबदारी असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनावे, असे आवाहन केले. डॉ. जयांद्र अहिरे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा ॲनालिटिक्स आणि हरित ऊर्जा क्षेत्रातील संधींचा वेध घेत तंत्रज्ञानाचा समाजहितासाठी वापर करण्याचा संदेश दिला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. मनेश कोकारे यांनी संस्थेच्या संशोधन परंपरेचा गौरव करत अशा परिषदांमुळे विद्यार्थ्यांच्या नवोन्मेषी विचारांना चालना मिळते, असे नमूद केले. परिषदेच्या समारोप सत्रात पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी हरित रसायनशास्त्र, नवोन्मेष आणि उद्योग-अकादमिक सहकार्य यांचे महत्त्व अधोरेखित करत संशोधनाला शाश्वत विकासाशी जोडण्याचे मार्गदर्शन केले.

या परिषदेत उद्योगक्षेत्राचाही सक्रिय सहभाग दिसून आला. गोदावरी ड्रग्स लिमिटेड तसेच धनमुद्रा बँक, नांदेड आणि इतर विविध औद्योगिक संस्थांच्या सहकार्यामुळे परिषदेला अधिक व्यावहारिक व उद्योगाभिमुख दृष्टीकोन प्राप्त झाला. तांत्रिक कार्यशाळा, शोधनिबंध व पोस्टर सादरीकरण, तज्ज्ञांची व्याख्याने आणि उद्योगाभिमुख स्पर्धांमुळे वातावरण अधिक ज्ञानसमृद्ध झाले. महाराष्ट्रासह देशभरातून एकूण ५६ सहभागी विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

उत्कृष्ट शोधनिबंध आणि नाविन्यपूर्ण सादरीकरणांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एस. बी. देठे, डॉ. ए. डब्ल्यू. देशमुख, डॉ. संदीप मुंढे, डॉ. ए. पी. चव्हाण, प्रा. पी. ए. पवार, डॉ. डी. यू. गिराम आणि डॉ. पी. के. रामटेके यांसह सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.

# संघ शताब्दी संवाद कार्यक्रमाचे आयोजन संपन्न

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

गेल्या शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ रोजी पटेल मंगल कार्यालय अहिल्यानगर येथे संघ शताब्दी संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील सज्जन शक्तीला संघटित करणे आणि संघकार्याची माहिती देऊन त्यांच्याशी संवाद साधणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा संपर्क प्रमुख श्री. शतानंद कलेढोणकर ह्यांनी केले. वक्ता परिचय श्री.निखिल कुलकर्णी ह्यांनी केले तर वैयक्तिक पद्य श्री. चिन्मय देशपांडे ह्यांनी सादर केले .




रा.स्व.संघाचे क्षेत्र प्रचारक मा. सुमंतजी आमशेकर ह्यांनी आपल्या बौद्धीकातून संघकार्याचा परिचय करून दिला. हिंदुराष्ट्र संकल्पना, डॉ हेडगेवार ह्यांचा जीवनप्रवास सांगतानाच संघ नेमके काय आणि कसे काम करतो याचे विविध पदर त्यांनी उलगडून दाखवले. व्यक्तीनिर्माणातून राष्ट्रनिर्माण हाच संघाच्या कामाचा गाभा आहे आणि या विचारांशी बांधिलकी ठेवणाऱ्या जवळपास ३७ संघटना संघ परिवाराचा भाग आहेत असं त्यांनी सांगितलं. त्यानंतर प्रांत कार्यकारिणी सदस्य मा. दिलीपराव क्षीरसागर ह्यांनी पंचपरिवर्तन हा विषय सविस्तर निवेदन केला. स्वभाषा, स्वभूषा, स्वदेश, स्वभोजन, स्वभजन, स्व-भ्रमण असे स्वबोधाचे मुद्दे सांगतानाच समरसता हा भारतीयांचा स्थायी भाव आहे हे सांगितले. आपली संस्कृती, त्यातल्या रूढी, परंपरा, सण - वार पर्यावरण पूरक आहे त्यामुळे पर्यावरण रक्षण हा आपला DNA आहे असं ते म्हणाले. कुटुंब संस्था हे भारताचे बलस्थान आहे. आज लिव्ह इन रीलेशनशिप, सिंगल पॅरेंटिंग, प्रत्येकाची वैयक्तिक स्पेस या सगळ्यातून स्वकेंद्री समाजाची निर्मिती होते आहे जी धोकादायक आहे. हे सांगतानाच नागरिक म्हणून हक्क उपभोगताना नागरिक म्हणून करण्याच्या अनेक छोट्या छोट्या कर्तव्यांची त्यांनी आठवण करून दिली. त्यानंतर उपस्थितांपैकी अनेकांनी त्यांच्या मनातले प्रश्न विचारले त्यालाही मा. सुमंतजीनी समाधानकारक उत्तरे दिली.काही उत्तम सूचनांचेही स्वागत करण्यात आले.



डांग जिल्हा पंचायतच्या आरोग्य विभागात गेल्या तीन दशकांपासून निष्ठेने सेवा देणाऱ्या आरोग्य कर्मचारी सीताबेन गाइन या आज वयोमानानुसार निवृत्त झाल्या. त्यांच्या सन्मानार्थ आज तालुका आरोग्य कार्यालय आहवा, जिल्हा पंचायत भवन येथे आरोग्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भावपूर्ण निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. सीताबेन गाइन यांनी सन १९९७ मध्ये डांग जिल्हा आरोग्य सेवेत प्रवेश केला होता. त्या आज दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी निवृत्त झाल्या. त्यांनी सुमारे ३० वर्षे डांग जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) – गारखडी, कालीबेल तसेच सामुदायिक आरोग्य केंद्र (CHC) शामगहान येथे स्टाफ नर्स म्हणून सेवा बजावली होती.

## अहिल्यानगर अखिल विश्व गायत्री परिवाराच्या वतीने २४ कुंडीय महायज्ञ संपन्न

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

■ हम बदलेंगे-युग बदलेगा' हे ब्रीदवाक्य घेऊन व्यक्ती सुधारणा ते राष्ट्र निर्माणाचे गायत्री परिवाराचे कार्य - काशीनाथ मोडे

गायत्री परिवाराची स्थापना पं.श्रीराम शर्मा आचार्य यांनी १९५८ मध्ये केली.हरिद्वार येथील गायत्री परिवार हे एक आध्यात्मिक व सामाजिक संघटन आहे.भारतीय संस्कृती व सनातन धर्म च्या माध्यमातून गुरुदेवांनी अखंड ज्योत १९२६ रोजी स्थापन केली २०२६ शंभरवर्ष पूर्णत्वाकडे अखंड साधना अखंड यज्ञ चालू आहे. भारतीय ऋषी परंपरा संस्कृती टिकवण्यासाठी व आजच्या युगामध्ये प्रत्येक मानव सद्बुद्धीच्या मार्गावरती चालण्यासाठी अखंड गायत्री साधना व गायत्री महायज्ञ परंपरा चालू आहे.विज्ञान श्रेष्ठ आहे व अध्यात्म अजूनही श्रेष्ठ आहे दोघांच्या एकरूपतीसाठी वातावरण व पर्यावरण शुद्धी करण करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी समजून सर्वांना निसर्गाच्या मदतीसाठी "वसुदैव कुटुम्बकम" ची भावना ठेवून घरोघरी गायत्री महायज्ञ करण्याचे नियोजन अहिल्यानगर शहरांमध्ये सुरू केलेले आहे. "हम बदलेंगे-युग बदलेगा" हे ब्रीदवाक्य घेऊन व्यक्ती सुधारणा ते राष्ट्र निर्माणाचे कार्य गायत्री परिवार सातत्याने करीत आहे.लोककल्याणाकरिता गायत्री महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. गायत्री मंत्राची सामूहिक साधना,वैज्ञानिक आधारावर मंत्रशक्तीचा प्रचार,१६ संस्कारांचे पुनरुज्जीवन, पर्यावरणपूरक यज्ञ, व्यसनमुक्ती,स्त्रियांना गायत्री मंत्राचा अधिकार, कोट्यवधी वृक्षांची लागवड, गंगा स्वच्छता,जलसंरक्षण असे सामाजिक हित जोपासणारे गायत्री परिवाराचे कार्य आहे.असे प्रतिपादन अहिल्यानगर अखिल विश्व गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे यांनी केले आहे. अरणगाव रोडवरील,आझाद नगर येथे अखिल विश्व गायत्री परिवाराच्या वतीने २४ कुंडीय महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव,शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त प्रा.माणिक विधाते,कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजीराव गायकवाड, अहिल्यानगर अखिल विश्व गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे,विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर,विश्व हिंदू परिषद मंदिर,अर्चक पुरोहित आयमाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,सहप्रमुख हरिभाऊ डोळसे,अरुण खिची,वीरेंद्र शिंदे,चंद्रकांत पुंड,देविदास साळुंखे आदी उपस्थित होते.

## ५ विधानपरिषदेचे आमदार

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय कार्यालयाकडून विधान परिषदेसाठी पाच उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली असून, यामध्ये अहिल्यानगर कोपरगाव तालुक्यातील युवा नेते विवेक कोल्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या निर्णयामुळे कोपरगावला आता दुसरा आमदार मिळणार आहे. विवेक कोल्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याने कोल्हे समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय मूळचे अहिल्या नगर जिल्ह्यातील असलेले आणि भाजपच्या संघटनेत काम करणारे निष्ठावंत सुनील कर्जतकर यांनाही भाजपने विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे. कर्जतकर हे मूळचे जामखेड तालुक्यातील नान्नज जवळा येथील आहेत. कर्जतकर यांच्या रूपाने कर्जत जामखेड मतदारसंघाला तिसरा आमदार मिळाला आहे.

## डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत रिदम 2K26 पारितोषिक वितरण संपन्न

■ “सातत्य, कष्ट आणि सतत शिकण्याची वृत्तीच यशाची गुरुकिल्ली” – अमित रत्नपारखी

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**



विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित ‘रिदम 2K26’ या वार्षिक कार्यक्रमातील पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि माजी विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून ॲडव्होकेट श्री. वसंतराव कापरे उपस्थित होते, तर मुख्य अतिथी म्हणून श्री.अमित रत्नपारखी (मेकॅनिकल, बॅच 1994) यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. श्री. अमित रत्नपारखी सध्या स्टरलाइट टेक्नॉलॉजिस लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर येथे ग्लोबल प्रोक्योरमेंट हेड म्हणून कार्यरत असून त्यांना ३० वर्षांहून अधिक औद्योगिक अनुभव आहे. त्यांनी आपल्या व्यावसायिक प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. आपल्या भाषणात श्री. अमित रत्नपारखी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “यश मिळवण्यासाठी सातत्य, कष्ट आणि सतत शिकण्याची वृत्ती अत्यंत महत्त्वाची आहे. अभियांत्रिकी शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष जीवनात त्याचा उपयोग करून नवकल्पना करण्यावर भर द्यावा.” त्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी कौशल्यविकास तांत्रिक ज्ञान आणि संवाद कौशल्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना अपयशाला घाबरू नका, तर त्यातून शिकून पुढे जाण्याचा सल्ला दिला. त्यांच्या या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली. कार्यक्रमास मान्यवर पाहुणे म्हणून श्री. प्रवीण म्हस्के आणि श्री. संदीप चंगेडे यांची उपस्थिती लाभली. श्री. प्रवीण म्हस्के (बॅच 2001) हे Infosys मध्ये प्रिन्सिपल डेटा सायंटिस्ट म्हणून कार्यरत असून त्यांना २४ वर्षांचा अनुभव आहे. ते डेटा सायन्स आणि मशीन लर्निंग क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. श्री.संदीप चंगेडे (बॅच 1993) हे सिस्कॉन कॅम्पुटर सिस्टीम, पुणे यांच्याशी संलग्न यशस्वी उद्योजक आहेत. या प्रसंगी डॉ. पी.एम. गायकवाड, सेक्रेटरी जनरल विखे पाटील फाउंडेशन चे प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.आर.आर. नवथर यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यात अकॅडमिक प्राइजेस, स्पोर्ट्स प्राइजेस,आर्ट एक्झिबिशन, पद्मश्री करंडक इत्यादींचा समावेश होता. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलन समन्वयक प्रा. सुनील मांढरे तसेच या कार्यक्रमासाठी डॉ.संदीप उदावंत, प्रा. पंकज औताडे, डॉ.कानिफ मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाचे संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे चेअरमन व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.




बुवासाहेब नवले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष,
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य व
अकोले तालुका काँग्रेस कमिटीचे सचिव
**मा. रमेशराव जगताप (अण्णा)**
यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

कर्तृत्वाची चढती कमान
अशीच झळकत राहो!

मार्गदर्शक



मा. मधुकरराव (भाऊ) नवले



मा.श्री.रमेशराव जगताप

मा.डॉ.श्री.
विश्वासराव आरोटे



संपादक, दैनिक समर्थ गांवकरी
संपादक,व्हीपी वृत्तवाहिनी
संचालक : अकोले ग्रा.बि.शे.सह.पतसंस्था मर्या; अकोले
राज्य सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई

बुवासाहेब नवले
ग्रा.बि.शे.सहकारी पतसंस्था मर्या; अकोले
ता.अकोले, जि.अहमदनगर
मा.श्री.मधुकरराव नवले (चेअरमन)
मा.श्री.रमेशराव जगताप (व्हा.चेअरमन)

सन्मा.संचालक मंडळ

| | |
|---|---|
| मा. आनंद निवृत्ती नवले | मा. गवराम महादु ताजणे |
| मा. प्रकाश आण्णासाहेब देशमुख | मा. रामदास लक्ष्मण शेटे |
| मा. विठ्ठल ममताजी धुमाळ | मा. साईनाथ भाऊसाहेब नवले |
| मा. रामदास विठ्ठल धुमाळ | मा. अनिल जनार्दन गायकवाड |
| मा. भास्कर कोंडाजी दराडे | मा. भागवत रावसाहेब शेटे |
| मा. दिलीप उमाजी मंडलिक | मा. विक्रम एकनाथ मंडलिक |
| मा. शिवाजी आनंदा चौधरी | मा. सुर्यभान सुदाम नाईकवाडी |
| मा. मुरलीधर सिताराम शेणकर | सौ. प्रतिभा भास्कर घुले |
| मा. सुजीत गुलाब नवले | सौ. संगिता कोंडीराम चौधरी |
| मा. भाऊसाहेब बाळाजी झोळेकर (त.सं.) | मा. शरद सखाराम पानसरे (स्वी.सं.) |
| मा. शांताराम तुकाराम काकड | मा. दादाभाऊ झोळेकर (व्यवस्थापक कर्ज विभाग) |
| मा. लखन माता शिंदे (सरव्यवस्थापक) | |

बुवासाहेब नवले मल्टीस्टेट
को. ऑप.क्रेडीट सोसायटी, लि.
अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर



मा.श्री.विक्रमराव नवले
चेअरमन
संचालक,अ.स.सा.का.



मा.श्री.नवनाथ वाळुंज
व्हा.चेअरमन

सन्मा.संचालक मंडळ

| | |
|---|---|
| मा. कपिल प्रमोद रासने | श्री. महीपाल प्रल्हाद देशमुख |
| सौ. रचना वसंत बाळसराफ | श्री. रघुनाथ किसन शेणकर |
| श्री. श्रीकांत आनंद नवले | सौ. सुनेत्रा सतीश वाकचौरे |
| श्री. मदन गंगाधर आंबरे | श्री. रमेश काशिनाथ नाईकवाडी |
| श्री. एकनाथ भिकाजी सहाणे | श्री. सचिन रमेश जगताप |
| मा. रोहिदास जाधव | श्री. सुनिल मनोहर नवले |

श्री. विलास दादा नवले (कार्यकारी संचालक)





मा.रमेशराव जगताप व
मा.ह.भ.प. दिपक महाराज देशमुख
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्र ॲल्युमिनीअम ॲण्ड ग्लास हाऊस
सारडा पेट्रोल पंपाच्या मागे,अकोले

पिंगळे ॲण्ड सन्स ग्लास कॉर्पोरेशन
नवलेवाडी फाटा, अकोले

प्रोप्रा.श्री.भारतशेठ पिंगळे (मोबा.९४२३४६४६०३)
श्री.रोशन भारत पिंगळे (मोबा.८६६८३३३४५२)

हॉटेल सूर्या
(परमीट रुम ॲण्ड बिअर बार)
महात्मा फुले चौक, अकोले
राजू अण्णा मन्ने


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘वंडर एक्सॉन’ तंत्रज्ञान; बाणेरमध्ये देशातील पहिले प्रगत उपचार उपलब्ध

पुणे (स. गांवकरी) : बदलती जीवनशैली, जिमसाठी कमी वेळ आणि झटपट फिटनेसच्या अपेक्षांमुळे ‘मसल टोनिंग’ हा फिटनेस क्षेत्रातील नवा ट्रेंड ठरत आहे. अशा पार्श्वभूमीवर कोणत्याही शस्त्रक्रियेविना वजन कमी करण्यासोबत सुदृढ स्नायू आणि सुडौल शरीरासाठी ‘वंडर एक्सॉन’ हे प्रगत तंत्रज्ञान प्रभावी ठरत असल्याची माहिती त्वचारोगतज्ज्ञ डॉ. पल्लवी अहिरे-शेळके यांनी दिली. बाणेर येथील ‘स्किनएथिक्स’ हॉस्पिटलमध्ये या जागतिक तंत्रज्ञानाधारित उपचारपद्धतीची भारतातील पहिली सुविधा उपलब्ध झाली आहे. पत्रकार परिषदेत डॉ. अहिरे-शेळके म्हणाल्या, “फक्त वजन कमी करणे पुरेसे नसून शरीर सुदृढ राहण्यासाठी स्नायूंची योग्य वाढ महत्त्वाची आहे. ‘वंडर एक्सॉन’ तंत्रज्ञानामध्ये उच्च क्षमतेचे न्यूरोमस्क्युलर स्टिम्युलेशन आणि रेडिओफ्रिक्वेन्सी यांचा एकत्रित वापर केला जातो. यामुळे स्नायू बळकट होतात, त्वचेचा ताण वाढतो आणि शरीर अधिक टोन दिसते.” त्या पुढे म्हणाल्या की, “ही उपचारपद्धती पूर्णपणे नॉन-सर्जिकल असून व्यायाम करण्यास अडचण असलेल्या रुग्णांसाठीही उपयुक्त ठरते. युरिनरी इन्कॉन्टिनन्स, डायस्टॅसिस किंवा काही औषधोपचारांमुळे स्नायू कमी होणाऱ्या रुग्णांनाही याचा फायदा होऊ शकतो.” स्किनएथिक्स हॉस्पिटल गेल्या बारा वर्षांपासून त्वचा, केस आणि सौंदर्य उपचारांच्या क्षेत्रात कार्यरत असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सुरक्षित आणि परिणामकारक उपचार देत आहे. प्रत्येक रुग्णासाठी वैयक्तिक उपचार योजना आणि दीर्घकालीन परिणामांवर भर दिला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी डॉ. कांचन मुळे, डॉ. प्राजक्ता शर्मा, डॉ. प्रियांका बोबडे आणि बाणेर-बालेवाडी मेडिकल असोसिएशनचे संस्थापक डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते.



### राहुरीतील स्टेट बँकेचे एका इसमाने चार एटीएम मशीन फोडले

राहुरी (स. गांवकरी) : राहुरी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाचे 4 एटीएम मशिन्स आज सकाळी एका इसमाने फोडल्याची धक्कादायक घटना घडली. आज सकाळी दहा वाजताच्या सुमारास नगर मनमाड रस्त्यावर असलेल्या स्टेट बँकेच्या राहुरी शाखेच्या आवारात चार एटीएम मशिन्स असून आज सकाळी एका इसमाने एटीएम मध्ये घुसून चारही एटीएम मशिन वर दगड टाकून फोडले. या एटीएम सेंटरमध्ये दोन सीडीएम ( कॅश भरणा ) व दोन एटीएम असून एटीएम फोडल्यानंतर आजूबाजूच्या ग्राहकांनी तात्काळ बँक अधिकारी व सुरक्षा रक्षकांशी संपर्क साधला. या माथेफिरूला तात्काळ ताब्यात घेऊन पोलिसांना कळविण्यात आले. लाखो रुपयांचे हे एटीएम मशीन असून पुढील कारवाई पोलीस घटनास्थळी दाखल होऊनराहुरी पोलिसांनी सदर इसमाला ताब्यात घेतले आहे.

### उष्णतेमुळे टेम्पोला आग, अग्निशामक दल पोहोचू शकले नाही



पुणे (स. गांवकरी) : हडपसर येथील ससाणे नगर, गल्लीनंबर ३ मध्ये उष्णतेच्या तीव्रतेमुळे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. हातावर पोट असलेले भाजीचा रायकर यांचा रिकामा टेम्पो अचानक पेट घेतल्याची घटना घडली. ही आग इतकी वेगाने पसरली की परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिकांनी तात्काळ अग्निशामक दलाला माहिती दिली. मात्र, गल्लीतला रस्ता अतिशय अरुंद असल्यामुळे अग्निशामक दलाच्या गाड्यांना घटनास्थळी पोहोचता आले नाही. दरम्यान, राकेश वाघमारे यांनी गल्लीत मागील बाजूने, न्यू इंग्लिश स्कूलच्या मार्गाने अग्निशामक दलाला आत आणण्याचा प्रयत्न केला. परंतु, तिथेही योग्य रस्ता उपलब्ध नसल्यामुळे मदत पोहोचवणे शक्य झाले नाही. या घटनेमुळे रायकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या टेम्पोचे इन्शुरन्स मिळावे अशी मागणी राकेश वाघमारे यांनी केली आहे. सध्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, तसेच अशा अरुंद रस्त्यांमुळे आपत्कालीन सेवा पोहोचण्यात येणाऱ्या अडचणी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत.

### कागदपत्र पडताळणी व प्रवेशासाठी अंतिम मुदतवाढ

ठाणे (स. गांवकरी) : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (RTE) अंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी २५ टक्के राखीव प्रवेश प्रक्रियेत सोडतद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्र पडताळणी व प्रवेश निश्चित करण्यासाठी दि. ३० एप्रिल, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. या प्रक्रियेस प्रतिसाद देणाऱ्या पालकांच्या सोयीचा विचार करून तसेच सर्व पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी दि. ०१ मे २०२६ ते दि. ०८ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही मुदतवाढ अंतिम असून, दिलेल्या कालावधीत पालकांनी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून संबंधित शाळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे की, या कालावधीनंतर कोणतीही पुढील मुदतवाढ दिली जाणार नाही. त्यामुळे सोडत यादीत नाव असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांनी विलंब न करता तत्काळ आवश्यक कार्यवाही करावी. प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे, अर्जाची माहिती व संबंधित शाळांची माहिती अधिकृत पोर्टलवर उपलब्ध असून, पालकांनी ती तपासून नियमानुसार प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. “आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव प्रवेश ही वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची संधी आहे. कोणताही पात्र विद्यार्थी केवळ कागदपत्र पडताळणी न झाल्यामुळे वंचित राहू नये, यासाठी ही अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. पालकांनी दिलेल्या कालावधीत सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करून घ्यावा.

# दिव्यांग पोर्टल शिबीराचे उद्घाटन - दिव्यांगांचा उस्फुर्त सहभाग

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

शासन आदेशानुसार शहरी व ग्रामीण भागातील दिव्यांग पोर्टलवर आँनलाईन नाव नोंदणी ३० एप्रिल पर्यंत नाव नोंदणी सक्तीची केल्याने श्री राधेश्याम दिव्यांग सशक्ती करण केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रुप जुन्नरच्या वतीने जुन्नर शहरातील व तालुक्यातील २१ प्रकारच्या दिव्यांग लोकांच्या दिव्यांग पोर्टलवर आँनलाईन नाव नोंदणी चे शिबीर जुन्नर शहरातील पणसुंबा पेठ सुर्यकुंड महादेव मंदिर सभागृहात आयोजित केले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला पुष्पहार नव निर्वाचित नगराध्यक्षा सुजाता काजळे यांच्या शुभहस्ते व अँड. समीर पुरवंत नगरसेवक माजी नगरसेवक




मधुकर काजळे सामाजिक कार्यकर्ते गणेश पुरवंत,अलोक जंगम,श्रीकांत जाधव राज फांऊडेशन अध्यक्ष उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरुण शेरकर यांनी शहरातील व ग्रामीण भागातील दिव्यांग लोकांना आँनलाईन नोंदणी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी व फसवणूक होते या बाबतीत माहिती दिली तसेच २१ प्रकार च्या दिव्यांग लोकांच्या येणाऱ्या अडचणी व शासनाच्या वतीने मिळणाऱ्या लाभाची माहिती दिली या वेळी जुन्नर नगरीचे नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी शहरातील व तालुक्यातील दिव्यांग लोकांना शासनाच्या वतीने मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी काहीही अडचणी आल्या किंवा वैयक्तिक काही अडचणी आल्या तर फोन वर किंवा समक्ष भेट घेऊन आपल्या अडचणीसोडवून घेण्यासाठी आव्हान केले तसेच जुन्नर शहरातील दिव्यांग लोकांना लवकर टक्के निधीचे कार्यक्रम घेवुन पाच टक्के निधिचे वाटप करण्यात येईल असे आश्वासन दिले या वेळी श्री राधेश्याम संस्था चे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण,अरुण शेरकर अध्यक्ष ,मिलिंद खरात योगिता खरात ग्राहक कल्याण फाऊंडेशन चे जुन्नर तालुका अध्यक्ष के.डी .अण्णा सरोदे अध्यक्षा वंदनाताई वाघचौरे डिजिटल सेवा केंद्रचे अविनाश म्हस्के म्हस्के मँडम, प्रताप मालेगावकर, श्रीहरी नायकोडी , विजय शेळके, हनुमंत थोरवे केरभाऊ नायकोडी,सचिन व्हावळ सुनील जंगम,गोरक्ष नरवीर ,सुर्यकांत जाधव,दिगांबर झींझाड,विलास जाधव,रामदास पाटेकर,विठ्ठल जाधव,मजहर सौदागर,मुस्तकिम पिरजादा ताहोर आत्तर,वंदनाताई घोणे व जुन्नर शहरातील व तालुक्यातील दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते याशिबिरात १७६ दिव्यांग लोकांनी दिव्यांग पोर्टल वर आँनलाईन नाव नोंदणी केली या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण यांनी जुन्नर तालुक्याती ल व परिसरातील दिव्यांग लोकांनी आपले आधार कार्ड,युडिआयडी आँनलाईन प्रमाणपत्र करिता येणाऱ्या अडचणी करिता समक्ष किंवा मोबाईल संम्पर्क करुन आपल्या अडचणी सोडविण्याचे आव्हान केले आहे तसेच दिव्यांग पोर्टल वर ३० एप्रिलच्या आत नाव नोंदणी करून घ्यावी अन्यथा शासकीय लाभापासून वंचित रहावे लागेल आँनलाईन नाव करून घ्यावी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व दिव्यांग बांधवाचे आभार मानले

## इस्कॉन मंदिरात नृसिंह जयंती उत्साहात साजरी

(स. गांवकरी)

द्वारका येथील श्री श्री राधा मदन गोपाल मंदिर (इस्कॉन) येथे गुरुवारी (दि. ३०) नृसिंह जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. “माझ्या भक्तांचा कधीच नाश होत नाही,” असे भगवान श्री कृष्ण यांनी भगवद्गीतेत सांगितले त्याचीच पूर्तता करणारा हा दिवस! उत्सवानिमित्त मंदिर व गर्भगृहाची फुले आणि पानांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. सध्या सुरू असलेल्या चंदन यात्रेनिमित्त मदन गोपालजींच्या विग्रहांना चंदन लेपन करण्यात आले. तसेच भगवान नृसिंह व श्री श्री राधा मदन गोपाल यांच्या विग्रहांचा विशेष श्रृंगार करून नवीन वस्त्रे, विविध फुलांचे हार व दागिन्यांनी अलंकृत करण्यात आले. या सोहळ्याची सुरुवात पहाटे ५ वाजता मंगळ आरतीने झाली. त्यानंतर हरे कृष्ण महामंत्र जप, गुरु पूजा, श्रृंगार आरती, दर्शन व नृसिंह कथा यांचे आयोजन करण्यात आले. नृसिंह कथेसाठी इस्कॉनचे सन्यासी प.पू. अनंत कृष्णदास गोस्वामी महाराज यांची विशेष उपस्थिती होती. दि. २९ व ३० रोजी आयोजित दोन दिवसीय नृसिंह कथेत त्यांनी 'भगवंत चराचरात स्थित आहेत आणि ते प्रल्हाद महाराजांसारख्या शुद्ध भक्तांनाच दृष्टीगोचर होतात. भगवंत



भक्तांच्या आधीन असतात म्हणुन प्रल्हाद महाराजांच्या हाकेला प्रतिसाद देत, नरसिंह भगवान त्यांच्या रक्षणासाठी खांबातून प्रकट झाले. भगवंतांना प्रकट करण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही, परंतु भक्ताचा निस्वार्थ भाव पाहून भगवंत स्वः इच्छेने दर्शन देतात, असे सांगितले. अशाप्रकारे निर्भयता आणि भगवंत चिंतनाचे महत्त्व स्पष्ट केले. संध्याकाळी ४:३० वाजल्यापासून कीर्तनाचा उत्सव रंगला. सायंकाळी ७ वाजता पंचामृत व विविध फळांच्या रसाने भगवान नृसिंहांचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर १०८ अन्नपदार्थांचा नैवेद्य अर्पण करून महाआरती करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## अध्यक्षपदी श्याम तिवारी, उपाध्यक्षपदी मंगेश सालपे

### सचिवपदी गोरक्षनाथ मदने व कोषाध्यक्षपदी अमोल मतकर



संगमनेर : (स. गांवकरी)

पत्रकारितेतील एकता आणि सहकार्याचा वारसा जपणाऱ्या तसेच स्थानिक पत्रकारांच्या हक्कासाठी लढणाऱ्या संगमनेर श्रमिक पत्रकार संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नूतन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. आगामी वर्षासाठी झालेल्या या निवडींमध्ये संघाच्या अध्यक्षपदी श्याम तिवारी, उपाध्यक्षपदी मंगेश सालपे, सचिवपदी गोरक्षनाथ मदने व कोषाध्यक्षपदी अमोल मतकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संगमनेर श्रमिक पत्रकार संस्था ही पत्रकारांच्या सुख - दुःखात नेहमीच पुढे असते. अनेक समाज हिताचे व पत्रकारांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम देखील या संस्थेने घेतलेले आहेत. त्याच बरोबर पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर राबविले आहे. माजी अध्यक्ष संजय अहिरे यांच्या संकल्पनेतून त्यांनी संघटनेतील सर्व पदाधिकारी व सदस्य यांचा कौटुंबिक स्नेह मेळावा आयोजित केला होता. संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्वच कार्यक्रमापेक्षा सुंदर असा स्नेह मेळावा पार पडला. तसेच सर्वांनीच याचे तोंड भरून कौतुक केले. दरवर्षी महाराष्ट्र दिनापूर्वी संस्थेची बैठक घेवून नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येत असते. त्यानुसार या बैठकीत वरीलप्रमाणे नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. विशेष म्हणजे संगमनेरच्या पत्रकारिता क्षेत्रात प्रदीर्घकाळापासून एकसंध राहिलेली ही संस्था आहे. त्यामुळे एकमताने निवड करण्याची परंपरा यावेळीही कायम राहिली.

यावेळी मावळते अध्यक्ष संजय अहिरे यांनी गेल्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा सादर केला. माजी उपाध्यक्ष शेखर पानसरे यांनी मागील वर्षाचा जमा-खर्च मांडला, तर माजी सचिव सतीश आहेर यांनी प्रास्तविक केले व सर्व उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी पत्रकार सुनील नवले, संजय अहिरे, सोमनाथ काळे, शेखर पानसरे, सतीश आहेर, संदीप वाकचौरे,गोरक्ष नेहे, आनंद गायकवाड, नीलिमा घाडगे, धीरज ठाकूर, बाबासाहेब कडू, सचिन जंत्रे, काशिनाथ गोसावी, सुनील महाले,भारत रेघाटे, सुशांत पावसे आदि उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

## ओतूर येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरातील विविध विकास कामांचे भूमिपूजन गुरुवार दि. 30 एप्रिल रोजी पार पडले. या विकास कामांमध्ये शनिमंदिर मागील ठिकेकर बोळ काँक्रीटीकरण रस्ता १० लक्ष रुपये, शनिमंदिर पासुन स्माशानभुमीकडे जाणारा काँक्रीटीकरण रस्ता - १० लक्ष रुपये, गावडे सरांचे घर ते कन्या हॉस्टेल काँक्रीटीकरण रस्ता १५ लक्ष रुपये, गोदरेजआधार ते भांबुर्डेकरांचे घर बंदीस्त गटार-२० लक्ष रुपये, भोईगल्ली सभामंडप (भोईराज गणेश मंडळ) -१० लक्ष रुपये या कामांचा समावेश आहे.




यावेळी बोलताना आमदार शरददादा सोनवणे म्हणाले की, “मी कुठल्याही कार्यकर्त्याच्या डोळ्यात अश्रू पाहू शकत नाही. कार्यकर्ता ही आमची उर्जा आहे. ही माझी नैतिक जबाबदारी आहे. माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला त्या सचोटीतून घडविले आहे. कोणत्याही विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. मी शेवटपर्यंत ओतूरकरांचा हात सोडणार नाही हे आश्वासन देतो.” ते पुढे म्हणाले की, “जुन्नर तालुक्यातील ओतूर, आळेफाटा व जुन्नर ही तिन्ही एसटी बस स्थानक एअरपोर्ट सारखे चकचकीत, काचेचे करण्यात येणार आहेत. प्रत्येक एसटी बस स्थानकाची किंमत तीन कोटी रुपये असणार असून पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) अंतर्गत हा खर्च ठेकेदार करेल. त्यातून तयार होणाऱ्या दुकानांच्या मिळणाऱ्या भाड्यातून ठेकेदाराचा खर्च भरून निघेल अशा पद्धतीचा आराखडा तयार करण्यात येत असून मे महिन्याच्या शेवटी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून पुढील वर्षभरात ही अद्ययावत एसटी बस स्थानके तयार होणार आहेत.”

“माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला शब्द दिला आहे की, १०० टक्के आपण जुन्नरला या महाराष्ट्राचे मॉडेल करू.” “युवकांनी व्यसनाधीन होऊ नका. आपल्या आई वडिलांच्या जमिनी विकू नका. विकलेल्या जमिनी तुम्हाला आयुष्यात परत मिळविता येणार नाही. त्यामुळे आपण त्याची काळजी घ्या. पुढील दोन वर्षात शेती उत्पादनात भरभराट होणार आहे.”

यावेळी अक्षदा मांडे, सचिन घोलप तसेच शिवसेना एकनाथ शिंदे पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, श्री कपर्दिकेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अनिलशेठ तांबे, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे, विनायकशेठ तांबे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे दिलीपराव डुंबरे व ग्रामस्थ उपस्थित होते.

## नाशिक महानगरपालिकेच्या सहा विभागात प्रभाग सभापतीची निवड

नाशिक : (स. गांवकरी)

महानगरपालिकेच्या ६ प्रभाग समिती सभापतीपदाची निवडणुक मा.विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी मा.विभागीय अप्पर आयुक्त अजय मोरे यांच्या अध्यक्षतेखाली काल मनपा मुख्यालय स्थायी समिती सभागृहात पार पडली . या प्रभाग समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीसाठी पूर्व विभाग प्रभाग सभापती पदासाठी १)मंगला प्रकाश नन्नावरे २)अत्तार नाझिया जाकीर यांनी अर्ज दाखल केले होते . त्यात अत्तार नाझिया जाकीर यांनी माघार घेतल्याने यामध्ये एकमेव अर्ज शिल्लक राहिल्याने नव्याने निवडून आलेल्या पूर्व प्रभाग सभापती पदी मंगला प्रकाश नन्नावरे या निवडून आल्याची घोषणा मा.विभागीय अप्पर आयुक्त अजय मोरे यांनी केली. तसेच पश्चिम विभाग १)पाटील सुरेश आण्णाजी पंचवटी विभाग- पिंगळे रोहिणी बापूराव नवीन नाशिक विभाग- बाळकृष्ण चंद्रभान शिरसाठ सातपूर विभाग- समाधान नामदेव देवरे यांचे एकमेव अर्ज असल्याने या विभागातील प्रभाग सभापती म्हणून निवडून मा.विभागीय अप्पर आयुक्त अजय मोरे यांनी केली. नाशिकरोड विभाग- १)मैंद प्रमिला कैलास २)धोंगडे रमेश शंकर यांनी अर्ज दाखल केले होते. त्यात मैंद प्रमिला कैलास यांनी माघार घेतली असल्याने यामध्ये एकमेव अर्ज शिल्लक राहिल्याने नाशिकरोड प्रभाग सभापती पदी धोंगडे रमेश शंकर हे निवडून आल्याची घोषणा मा.विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी मा.विभागीय अप्पर आयुक्त अजय मोरे यांनी केली. प्रभाग सभापतींची निवड झाल्यानंतर त्यांचा सत्कार महापौर हिमगौरी आहेर आडके, उपमहापौर विलास शिंदे,स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, तसेच मनपातील गटनेते, पदाधिकारी व नगरसेवक यांनी केला असल्याची माहिती नगरसचिव संजय नेरकर यांनी दिली.

# महाराजांच्या गौरवाचा अवमान सहन केल्या जाणार नाही

## दोषींवर तात्काळ कारवाई करा - करण गायकर

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्राच्या अस्मितेचे दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद व इतिहासद्रोही वक्तव्य करणाऱ्या धीरेंद्र शास्त्री व स्वामी आनंद स्वरूप यांच्या विरोधात तात्काळ कठोर कारवाई करावी,अशी ठाम मागणी छावा क्रांतिवीर सेनेच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन हे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,संबंधित व्यक्तींनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेली विधाने ही केवळ चुकीची नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचा अपमान करणारी व समाजात तेढ निर्माण करणारी आहेत. “गनिमी कावा”सारख्या अद्वितीय युद्धनीतीचा अवमान करणे, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला कमी लेखणारी विधाने करणे हा प्रकार अत्यंत निषेधार्ह आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची उभारणी करताना बलाढ्य सत्तांना पराभूत केले आणि सर्वसमावेशक,न्याय्य व लोककल्याणकारी राज्यव्यवस्था उभी केली.त्यांनी कोणत्याही जाती-



धर्माचा भेदभाव न करता हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.अशा महान कार्याचा विपर्यास करून चुकीचा इतिहास समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न हा गंभीर स्वरूपाचा असून तो भावी पिढ्यांसाठी धोकादायक आहे,असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर वक्तव्यांमुळे राज्यभर संतापाची तीव्र लाट उसळली असून सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांनी ही विधाने कोणाच्या प्रेरणेने केली आहेत का,याचाही तपास करावा,अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात भारतीय दंड संहितेतील कलम 153A (समाजात वैमनस्य निर्माण करणे),कलम 295A (धार्मिक भावना दुखावणे),कलम 505(2) (तेढ निर्माण करणारी विधाने) तसेच मानहानीसंदर्भातील कलम 499 व 500 अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच,ही विधाने सोशल मीडियावर प्रसारित झाल्यास माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसारही कारवाई करण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली.

छावा क्रांतिवीर सेनेने पुढील प्रमुख मागण्या यावेळी मांडल्या: संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा सार्वजनिकरीत्या महाराष्ट्राची व जनतेची जाहीर माफी मागण्यास भाग पाडावे भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमानासंदर्भात कडक कायदा करण्याबाबत राज्य व केंद्र शासनाने निर्णय घ्यावा “महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही.शासनाने तात्काळ कारवाई न केल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल,असा इशाराही छावा क्रांतिवीर सेनेच्या वतीने देण्यात आला. या वेळी हे निवेदन देण्यासाठी छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष संस्थापक अध्यक्ष करण गायकर प्रदेश कार्याध्यक्ष नवनाथ शिंदे,हरिभाऊ बोडके,प्रवीण पाटील,मुंबई अध्यक्ष प्रकाश साळुंखे,युवराज डुंबरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे




## दिव्यात रोको वडापावच्या उदघाट्न प्रसंगी लाखोंची बक्षीसे

ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीत अग्रस्थानी असलेला वडापाव आता एका कॉर्पोरेट ब्रँडच्या रूपात समोर येत आहे. भारतातील पहिले स्ट्रीट फूड बँड' अशी ओळख निर्माण करणाऱ्या 'रोको वडापाव' आता दिवा शहरवासीयांच्या चवीसाठी सज्ज झाले असून आज महाराष्ट्र व कामगारदिनी भव्यदिव्य उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. दिवा शिवसेना उपशहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश पाटील यांच्या विशेष मार्गदर्शनातून हा नविन व्यवसाय सुरू होत आहे. वडापावला केवळ एक खाद्यपदार्थ न ठेवता त्याला एक मोठा ब्रँड म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. 'ईट हॉट, हिट हार्ड' असे ब्रीदवाक्य असलेल्या या ब्रँडमुळे स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासोबतच खवय्यांना स्वच्छ आणि चविष्ट वडापाव मिळण्यास मदत होणार आहे. सदर सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'बिग बॉस मराठी' सीझन ६ ची विजेती तन्वी कोलते हिची उपस्थिती असणार आहे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून संध्याकाळी ७:०० वाजता दिवा शीळ रोडवरील 'चंद्रागण रेसिडेन्सी' येथे हा उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. या निमित्ताने दिव्यात वडापावच्या एका नव्या पर्वाची सुरुवात होत असून, परिसरातील नागरिकांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## ठाण्यात नालेसफाईंच्या कामांचा महापौरांच्या हस्ते शुभारंभ

ठाणे (स. गांवकरी) : ठाण्यातील कोपरी परिसरातील नालेसफाईच्या कामाचा शुभारंभ आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते करण्यात आला. ठाणे शहरातील विविध भागातील नालेसफाईच्या कामांना सुरूवात झाली असून आज कोपरी येथील बिम्सनाला येथून नालेसफाईच्या कामास सुरूवात करण्यात आली. पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची साफसफाई होईल या दृष्टीने नियोजन करून कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना महापौरांनी यावेळी दिल्या. या कार्यक्रमास स्थानिक नगरसेविका मालती पाटील, नम्रता पमनानी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पुरी तसेच नौपाडा-कोपरी प्रभाग समितीतील स्वच्छता निरीक्षक, मुकादम आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर प्रत्यक्ष नाल्याच्या साफसफाईच्या कामाला सुरुवात करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित स्वच्छता आणि देखभाल ठेवण्यावर भर देत नागरिकांनीही स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.

## एन.एम.एम.एस. परीक्षेत गावडे व राहिंज शिष्यवृत्तीधारक



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील क्षितिज कमलेश गावडे आणि सार्थक सतीश राहिंज या दोन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शिष्यवृत्ती मिळवली आहे. काष्टी येथील जनता विद्यालय विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये नेहमीच आघाडीवर असून, चालू वर्षी शासनामार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेत इयत्ता आठवीतील या दोन्ही विद्यार्थ्यांनी यश मिळवून विद्यालयाच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. शिष्यवृत्तीअंतर्गत या दोन्ही विद्यार्थ्यांना प्रत्येकी दरवर्षी 12 हजार रुपये, अशा चार वर्षांसाठी एकूण 48 हजार रुपये मिळणार असून, दोघांना मिळून एकूण 96 हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे मुख्याध्यापक पंडित घोंगडे, पर्यवेक्षक शिवप्रसाद मेहेत्रे तसेच विभागप्रमुख दीपक कुलांगे, मिनीनाथ मोरे, श्रीमती अश्विनी निकम व श्रीमती अर्चना कोरडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल राज्याचे माजी मंत्री बबनरावजी पाचपुते, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य अरुणराव पाचपुते, भगवानराव पाचपुते, बाळासाहेब राहिंज, सरपंच साजन भैय्या पाचपुते, सेवा संस्थेचे अध्यक्ष राकेशभाऊ पाचपुते, उपसरपंच शीतल ढमे, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रेमराज राहिंज, पालक व नागरिकांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## १६८९२ टंचाईग्रस्त नागरिकांना २८ टँकरने पाणीपुरवठा सुरू


शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ७ आदिवासी दुर्गम गाव व वाडी वस्ती तसेच या भागातील १२ ग्रामपंचायत येथील १६८९२ लोक संख्या टंचाईग्रस्त नागरिकांना २८ टँकरने पाणीपुरवठा प्रत्यक्षात सुरू आहे . कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद पुणे , उपविभागीय अधिकारी जुन्नर / आंबेगाव , तहसील कार्यालय जुन्नर व पंचायत समिती कार्यालय जुन्नर यांच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यातील त्यांच्याग्रस्त भागातील नागरिकांना पाणीपुरवठा सुरू आहे. शिंदेवाडी , आणे ,मांडवे ,कोपरे ,सुकाळवेढे , हडसर, निमगिरी , गोद्रे , अंजनावळे , नळावणे , हडसर व गुळूंचवाडी या ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना २०,०००/- , १०,०००/- ५,०००/- व १२,०००/- लिटल क्षमतेच्या टँकरने सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येत आहे . यासाठी ११ विहीर अधिग्रहण व १ बोरवेल या ठिकाणाहून टँकरने आदिवासी दुर्गम भागात पाणीपुरवठा सुरू आहे.

## सुजय नामे यांचा अध्यक्षपदावर झेंडा

मुंबई (स. गांवकरी) : अंधेरी न्यायालय बार असोसिएशनच्या 2026 च्या वार्षिक निवडणुकीत यंदा मोठा उलटफेर पाहायला मिळाला. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सुजय नामे यांनी आपल्या प्रतिस्पर्धी मधुसूदन द्विवेदी यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. एकूण पडलेल्या 1060 मतांपैकी सुजय नामे यांना 668 मते मिळाली, तर मधुसूदन द्विवेदी यांना 385 मते मिळाली. उपाध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत जे. पी. यादव यांनी 557 मते मिळवत विजय संपादन केला, तर त्यांचे प्रतिस्पर्धी अनिल ओझा यांना 443 मते मिळाली. सचिवपदासाठी कुणाल फुले यांना 527 मते मिळाली, तर पी. सी. मिश्रा यांना 507 मते मिळाली. संयुक्त सचिवपदी शैलेश पांडे यांना 532 मते मिळाली, तर विपुला नाईक यांना 481 मते मिळाली.

# ओबीसींच्या सर्वसमावेशक विकासावर शासनाचा भर

### इतर मागास बहुजन विकास विभागाचे मंत्री अतुल सावे : रोजगार मिळविण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा



नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)

दि. ३० एप्रिल रोजी इतर मागास वर्गाच्या (ओबीसी) आणि बहुजन समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. 'ओबीसींचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा विशेष भर' असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन विकास, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. नांदेड येथील विष्णू नगर भागातील शंकरराव चव्हाण सभागृहात इतर बहुजन कल्याण विभागाच्यावतीने आयोजित 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्यात' पालकमंत्री सावे अध्यक्षीय पदावरून बोलत होते. या कार्यक्रमास खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार बाबुराव कोहळीकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, इतर मागास बहूजन कल्याण संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, म.राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. वसंत माने, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलींद नारिंगे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे संचालक प्रताप पवार, वनार्टीचे संचालक प्रशांत वावगे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक तेजस माळवदकर, सहाय्यक संचालक सचिन खुने यांच्यासह परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर येथील संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे म्हणाले की, समाजातील तळागाळातील घटकांना आणि विशेषतः ओबीसी प्रवर्गातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. महामंडळांच्या माध्यमातून सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आजच्या या कर्ज वाटप मेळाव्याचा लाभ घेऊन तरुणांनी स्वतःचा व्यवसाय उभा करावा आणि राज्याच्या विकासात आपले योगदान द्यावे. रोजगार मिळविण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा, असे आवाहन मंत्री सावे यांनी केले.

वर्षभरात 75 विद्यार्थ्यांना जवळपास 60 लक्ष रुपयांपर्यत परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात 62 जिल्हानिहाय वसतीगृहे उभारले आहेत. यात केवळ मुंबई-पुणे शहरे अपवाद आहेत. या 62 वसतीगृहामध्ये 31 मुलीसाठी आणि 31 मुलांचे वसतीगृहे आहेत. याशिवाय आधार योजनेच्या माध्यमातूनही ओबीसी विद्यार्थ्यांना राहण्याची सोय शासनाकडून करण्यात येत आहेत. स्पर्धात्मक परीक्षेतही विद्यार्थ्यांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे ते म्हणाले. व्हीजेएनटीच्या 900 आश्रमशाळेतील 100 विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेतून इस्त्रोसारख्या संस्थाना भेट देण्यासाठी शासन पुढाकार घेत असल्याचेही पालकमंत्री सावे म्हणाले.

या ऐतिहासिक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना खासदार अशोक चव्हाण म्हणाले, वाढत्या स्पर्धेच्या काळात रोजगार आणि व्यावसायिक गुणवत्तेची गरज अधोरेखित झाली असून, 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. उद्योग उभारणीसाठी गरिबांना येणारी 'मार्जिन मनी'ची अडचण सोडवण्यासाठी सध्या १४ महामंडळे कार्यरत आहेत. आता गावागावांत सुविधा केंद्रे सुरू करून नावीन्यपूर्ण व्यवसायांना चालना दिली जात आहे. ओबीसी आणि इतर मागासवर्गीयांमधील जवळपास ६११ उपजातींना न्याय देण्याच्या उद्देशाने ३१ मार्च २०२६ पर्यंत तब्बल ७० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना कर्जवाटप करण्यात आले आहे.

## आळंदी इंद्रायणी नदी पात्रात दोन महिलांचे मृतदेह आढळले

आळंदी : (स. गांवकरी)

आळंदी येथील तीर्थक्षेत्र आळंदीतील इंद्रायणी नदीतील सिद्धबेट पाणी साठवण बंधाऱ्यात दोन अनोळखी महिलांचे मृतदेह इंद्रायणी नदीपात्रात तरंगत असलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. बुधवारी ( दि. २९ ) संध्याकाळी सात चे सुमारास ही धक्कादायक घटना निदर्शनात आली. घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलिसांनी तातडीने तपासाचे काम सुरू केले. या घटनेत धक्कादायक माहिती दोन्ही महिला साडीच्या सहाय्याने एकमेकींना घट्ट होत्या. प्राथमिक अंदाजा नुसार, या महिलांनी एकत्रित पणे नदीत उडी घेऊन आत्महत्या केली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. बुधवारी रात्री सिद्धबेट परिसरातील इंद्रायणी नदी पात्रात तरंगत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या लक्षांत आले. अधिक जवळ जाऊन पाहिल्याने दोन महिलांचे मृतदेह असल्याचे दिसले. नागरिकांनी तात्काळ आळंदी पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत दोन्ही महिलांचे मृतदेह नदी पात्रा बाहेर आणले. या दोन्ही महिला एकमेकींना साडीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आल्या. मृतांमध्ये एका महिलेचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे आणि दुसऱ्या महिलेचे वय अंदाजे ३५ वर्षांच्या आसपास आहे. या महिला नेमक्या कोण आहेत. आणि त्यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पिंपरीतील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पाठवले आहेत. या महिला नातेवाईक की मायलेकी होत्या का ? याचा तपास आळंदी पोलीस करीत आहे. परिसरात महिला बेपत्ता असल्याची तक्रार आहे का, याची माहिती घेऊन पडताळणी पोलीस करीत आहे.

## आदिवासी संस्कृतीचा जागर! कळवण तालुक्यातील धार्डे दिगर येथून बैलगाडीतून निघाली वरात

### थेट मोहबारीत झेंडूच्या फुलांच्या अक्षतांनी पार पडला 'आदिम' विवाह सोहळा

मोहबारी : (स. गांवकरी)

आधुनिकतेच्या झगमगाटात आपली मूळ संस्कृती आणि परंपरा लोप पावत चालली असताना, कळवण तालुक्यातील धार्डे दिगर येथील बहिरम परिवाराने एका आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्याचे आयोजन करून समाजासमोर आदर्श उभा केला आहे. वंदनाबाई आणि पोपट नामदेव बहिरम यांचा मुलगा चि. रोशन बहिरम याचा विवाह चि.सौ.कां. राजश्री भोये (रत्ना व संजय भोये मोहबरी यांची कन्या , व माजी पोलीस पाटील अजून भोये यांची नात) हिच्याशी अत्यंत दिमाखात, पूर्णपणे आदिवासी परंपरेनुसार विवाह सोहळा पार पडला. या विवाह सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे विवाहस्थळी



लावलेली महापुरुषांची प्रतिमांची आरास. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यागमूर्ती रमाई माता, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यासह आदिवासी क्रांतीकारक विर एकलव्य , भगवान बिरसा मुंडा, जननायक तंट्या भिल, राघोजी भांगरे, गोविंद गुरू आणि झलकारी बाई यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या महापुरुषांना साक्षी ठेवून, आदिवासी संस्कृतीला वंदन करत मंगलाष्टके गायली गेली.

या लग्नाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नवरदेव आणि वऱ्हाडी मंडळी आधुनिक वाहनांचा वापर न करता, पारंपरिक पद्धतीने बैलगाडीतून थेट दोन ते तीन किलोमीटर बैलगाडीतून वरात बैलगाड्यांतून वरात घेऊन थेट दोन ते तीन किलोमीटर अंतरावरून मोहबारी या ठिकाणी नवरीच्या गावाला पोहोचले. यावेळी जुन्या काळातील त्या साधेपणाचा आणि संस्कृतीचा प्रत्यय, जुने अनुभव उपस्थितांना आला.

पर्यावरणाचे रक्षण आणि परंपरा जोपासण्यासाठी या विवाह सोहळ्यात तांदळाच्या अक्षतांचा वापर न करता, *झेंडूच्या नैसर्गिक फुलांच्या पाकळ्यांची* उधळण करून नवदांपत्याला आशीर्वाद देण्यात आले. या 'आदिम लगीन सोहळ्या'बद्दल बोलताना नवरदेवाचे आई-वडील वंदना व पोपट बहिरम यांनी समाधान व्यक्त केले. "आपल्या पूर्वजांनी दिलेली संस्कृती हीच आपली खरी ओळख आहे. ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावी, या हेतूने आम्ही हा पारंपरिक सोहळा केला," असे त्यांनी अभिमानाने सांगितले.

या सोहळ्याचे वऱ्हाडी मंडळी कडून आणि परिसरातून मोठे कौतुक होत असून, "आदिवासी परंपरा जोपासणारा हा एक आदर्श विवाह सोहळा" असल्याची चर्चा सर्वत्र तालुक्यात चर्चा सुरू आहे.

## पारनेर बाजार समितीत कांद्याची १५ हजार गोणींची आवक

### उच्चांकी १४०० रुपये भाव

पारनेर : (स. गांवकरी)

- पारनेर बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांनी दिली

पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य आवारात बुधवारी कांद्याची मोठी आवक झाली असून, दर्जेदार कांद्याला प्रति क्विंटल १४०० रुपयांपर्यंतचा दर मिळाला आहे. दिवसभरात एकूण १५ हजार २४२ गोणींची आवक झाली असून, बाजार समितीच्या प्रशासनाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार एकूण ८ हजार १८५ क्विंटल कांद्याची विक्री झाली. आशी माहिती पारनेर बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर, उपसभापती संदीप सालके यांनी दिली आहे. बाजारपेठेत कांद्याच्या प्रतवारीनुसार दरामध्ये मोठी तफावत दिसून आली. उत्कृष्ट दर्जाच्या ५ ते १० वक्कल कांद्याला १३०० ते १४०० रुपये भाव मिळाला, तर नंबर १ च्या कांद्याला ११०० ते १२०० रुपयांपर्यंत दर मिळाला. मध्यम दर्जाचा म्हणजेच नंबर २ चा कांदा ८०० ते १००० रुपये आणि नंबर ३ चा कांदा ६०० ते ७०० रुपयांनी विकला गेला. सर्वात कमी दर्जाच्या कांद्याला २०० ते ५०० रुपये भाव मिळाला असून, गोलटा आणि गोलटी कांद्याला ५०० ते १००० रुपयांचा दर मिळाला.

यावेळी बाजार समितीचे सचिव आणि संचालक मंडळाने शेतकऱ्यांना मोलाचा सल्ला दिला आहे. बाजार समितीत शेतमालाची विक्री जाहीर लिलाव पद्धतीने होत असून, मालाच्या गुणवत्तेनुसारच भाव ठरवला जातो. जर शेतकऱ्याला मिळालेला भाव परवडणारा नसेल, तर लिलाव स्थगित करण्याचा अधिकार शेतकऱ्याला देण्यात आला आहे. तसेच, कांद्याची योग्य प्रतवारी करून आणि निवडून एकसारखा माल विक्रीसाठी आणल्यास चांगला भाव मिळतो, असेही प्रशासनाने स्पष्ट केले. मोंढा पद्धतीमुळे मालाची किंमत कमी होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते, त्यामुळे शेतकऱ्यांनी लिलावाच्या वेळी स्वतः उपस्थित राहून आपल्या मालाची योग्य विक्री करून घ्यावी, असे आवाहन सभापती, उपसभापती व सर्व संचालक मंडळाने केले आहे.



पारनेर बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सध्या कांद्याची आवक समाधानकारक असून, दर्जेदार मालाला १४०० रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत आहे. शेतकऱ्यांनी आपला कांदा विक्रीला आणण्यापूर्वी त्याची नीट प्रतवारी करावी, जेणेकरून त्यांना अधिक नफा मिळेल. शेतकऱ्यांनी स्वतः हजर राहून लिलावात सहभागी व्हावे. पारदर्शक लिलाव प्रक्रिया राबवून शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे.

**- गंगाराम बेलकर (सभापती : कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर)**

## छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

गणोरे : (स. गांवकरी)

गणोरे ( ता.अकोले ) येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या न्युतन इमारतीच्या भूमिपूजन सोहळा व माजी विद्यार्थी स्नेहमेळावा शनिवार दिनांक २ मे रोजी सकाळी नऊ वाजता आयोजित केला आहे या वेळी शाळेचे माजी विद्यार्थी व रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन एडवोकेट भगीरथ शिंदे यांचे शुभ हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्य मीनाताई जगधने राहणार आहे. यावेळी साईबाबा देवस्थानचे विश्वस्त डॉ. जालिंदर भोर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मनोज कवडे, सचिव विकासराव देशमुख, उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडके, सहाय्यक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, बांधकाम पर्यवेक्षक राम नलगे, बांधकाम समितीचे अध्यक्ष प्रकाश निकम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी न्यायमूर्ती चंद्रकांत दातीर, अकोले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर, सेवानिवृत्त प्राचार्य तुकाराम दातीर, तहसीलदार संजय भालेराव, खाद्य निगमचे सहाय्यक प्रबंधक संदीप वाकचौरे, अप्पर जिल्हाधिकारी तुकाराम हुळहुळे, जिल्हा परिषद अहमदनगर चे वित्तीय अधिकारी योगेश आंबरे, अन्न व औषध विभाग सहाय्यक आयुक्त प्रदीप आंबरे, सहाय्यक आयुक्त पुजा गोर्डे, असिस्टंट मॅनेजर नाबार्ड बॅक गोकुळ आंबरे, स्वदेश उद्योग समूहाचे बाळासाहेब माने, शिक्षण तज्ञ संदीप वाकचौरे, ह. भ. प.मदन महाराज वर्पे,पीएसआय निलेश आंब्रे अविनाश आंबरे, डॉ. रेवन वाकचौरे, डॉ. दत्तात्रेय आहेर, अक्षय आंबरे, सुशांत आहेर आदी उपस्थित राहणार आले.या सोहळ्यास गणोरे पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# बारसगावची यंदाची भीमजयंती मिरवणूक विशेष लक्षवेधी

### बारसगांव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी

अर्धापूर : (स. गांवकरी)

अर्धापूर तालुक्यातील बारसगांव येथे भारतरत्न प्रज्ञासूर्य क्रांतीसुर्य भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बारसगाव येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंती ची भव्य मिरवणु मोठ्या उत्साहात साजरी गावात सर्वत्र जल्लोषाचे वातावरण व फटाक्याची आतिषबाजी करत भिम अनुयायां असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत भीमजयंती उत्सव उत्साहपूर्ण वाताव होते जयंती साजरी करण्यासाठी

सकाळपासूनच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर

यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण



करून अभिवादन करण्यात आले भाषणे झाले .यावेळी उपस्थित मान्यवर नादेड चे ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे आदित्य पॉपटीचे मालक संघरत्न दादा खंदारे भगवान तारु अर्धापुर पोलीस स्टेशन चे उपनिरीक्षक चितरंजन ठेमकेवाड जयंती मंडळाचे अध्यक्ष बंटी मोरे उपाध्यक्ष पत्रकार आनंदराव मोरे सचिव ॲड राजरत्न सितळे कोषाध्यक्ष तानाजी वाघमारे सहसचिव माधव मोरे मिलींद ताटे देवा वाघमारे जमादार काळे प्राध्यापक भुरे रूपेश देशमुख शंकर हापगुडे होमगार्ड यावेळी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि समाज सुधारक निळ्या पताकांच्या देखावे भव्य मिरवणूक काढण्यातआली. मिरवणुकीत युवक, महिला , ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांनीही मोठ्या

उत्साहाने सहभाग नोंदविला.

आदी मान्यवर उपस्थित होते.

बाबासाहेबांनी दिलेल्या समता, बंधुता आणि न्यायाच्या विचारात चे चालण्याचे आवाहन केले. मिरवणुकीदरम्यान शिस्त बद्ध वातावरणात गावातील प्रमुख मार्गा वरून संचलन करण्यात आले. संपूर्ण गाव निळ्यामय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले बारसगाव नागरिकांच्या उत्स्फूर्त यंदाची भीमजयंती मिरवणूक विशेष लक्षवेधी ठरली

अर्धापूर तालुक्यातील मौजे बारसगांव येथे महामानव, विश्वरत्न प्रज्ञासूर्य क्रांतीसुर्य भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व परमपूज्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी जयंती मंडळाचे अध्यक्ष बंटी उर्फ विनय हिरामण मोरे उपाध्यक्ष पत्रकार आनंदराव भिमराव मोरे व अर्धापूर वचित बहुजन आघाडी चे ता अध्यक्ष विनय उर्फ बंटी हिरामण मोरे व कोषाध्यक्ष तानाजी भिमराव वाघमारे सचिव ॲड राजरत्न गोतम सितळे सहसचिव देवा शामराव वाघमारे संघटक माधव मारोती मोरे पोलीस पाटील सुनील मोरे भिमराव मोरे शामराव वाघमारे देविदास मोरे हिरामण मोरे खंडोजी वाघमारे गोतम सितळे शामराव वाघमारे शामराव मोरे ग्यानोजी ताटे नामदेव ताटे शिवाजी मोरे कामाजी मोरे शंकर नागोजी ताटे संजय ताटे कोंडीबा मोरे काशीनाथ मोरे शंकर ताटे नागेश सितळे दगडू मोरे दिलीप मोरे तुकाराम मोरे रुकेक्ष वाघमारे बबलु ताटे रवी मोरे दिपक मोरे सिध्दार्थ मोरे मिलींद ताटे विष्णु वाघमारे बाबासाहेब एडके सदीप मोरे संघर्ष ताटे सुरज धुताडे सुरेश ताटे गंगाप्रसाद वाघमारे श्रीरंग वाघमारे पुरभाजी ताटे राजु ताटे विजय देविदास मोरे मिलिंद ताटे पुरभाजी वाघमारे प्रभु ताटे नवनाथ ताटे भय्या ताटे विशाल ताटे जयपाल मोरे तथागत मोरे अजय मोरे विजय मोरे प्रकाश धुताडे माधव जमदाडे बापुराव कोलते शामराव कांबळे,अक्षय वाघमारे आकाश मोरे पिराजी ताटे पप्पू गायकवाड महेंद्र ताटे विकास ताटे सोपनिल मोरे आण्णा धुताडे सिद्धार्थ कसबे उपासक उपासिका आदी उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे



## अहिल्यानगरमध्ये विकासकामांना वेग

■ विविध विकास कामांना गती देण्यासाठी उड्डाणपुलाची डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडून पाहणी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील सुरू असलेल्या विविध विकासकामांना गती देण्यासाठी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देत पाहणी केली. यामध्ये सह्याद्री चौक ते सनफार्मा चौक दरम्यान उभारण्यात येत असलेल्या महत्त्वाच्या उड्डाणपुलाच्या कामाचा त्यांनी सखोल आढावा घेतला. या रस्त्याच्या पाहणीदरम्यान संबंधित अधिकारी व अभियंत्यांशी चर्चा करत डॉ. विखे पाटील यांनी उड्डाणपुलाच्या बांधकामाची सद्यस्थिती, कामाचा वेग तसेच गुणवत्तेबाबत माहिती घेतली. प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण व्हावा आणि काम दर्जेदार पद्धतीने व्हावे, यासाठी त्यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या. शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता हा उड्डाणपूल अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांना वाहतुकीतून दिलासा मिळणार असून, प्रवास अधिक सुलभ आणि जलद होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अशा पायाभूत सुविधांच्या कामांना प्राधान्य दिले जात असून, प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून ही कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.

## मेहुण्याकडून पतीला बेदम मारहाण; केडगाव परिसरातील घटना

अहिल्यानगर (स. गांवकरी) : केडगाव येथील नेप्ती रोड परिसरातील पठारे मळा येथे घरगुती वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून, पत्नीने बोलावलेल्या माहेरच्या मंडळींनी पतीला लाकडी दांडके आणि पाईपने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मच्छिंद्र पठारे आणि त्यांच्या पत्नीमध्ये सकाळी घरगुती कारणावरून वाद झाला होता. या वादाचा राग मनात धरून पत्नीने आपल्या माहेरच्या नातेवाईकांना फोन करून बोलावून घेतले. त्यानंतर आरोपी मेहुणा देविदास जगताप हा आपल्या इतर पाच साथीदारांसह पांढऱ्या रंगाच्या कारमधून पठारे यांच्या घरी पोहचला. फिर्यादी अहिल्यानगर येथून घरी परतल्यानंतर आरोपींनी त्यांना गाठले. “तुमचा माज जास्त वाढला आहे” असे म्हणत मेहुण्याने अवाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. फिर्यादीने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, उपस्थित महिला नातेवाईकाने त्यांचे हात धरून ठेवले. याच दरम्यान आरोपी देविदासने प्लास्टिक पाईपने तर इतर साथीदारांनी पट्ट्याने आणि लाकडी दांडक्याने फिर्यादीला बेदम मारहाण केली. या झटापटीत फिर्यादीच्या हातातील सुमारे दीड तोळे वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या कोठेतरी गहाळ झाल्या आहेत. आरोपींनी फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देऊन तेथून पळ काढला. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी देविदास जगताप, चिंगु जगताप, मनीषा जगताप आणि इतर तिघांविरुद्ध मारहाण व धमकावल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## एकतर्फी प्रेमातून तरुणीने तरुणाच्या कुटुंबाला घरातच डांबले

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील केडगाव परिसरात एकतर्फी प्रेमातून एका तरुणीने एका कुटुंबाच्या घरात घुसून धिंगाणा घातल्याची खळबळजनक घटना घडली आहे. संबंधित मुलाशी लग्न लावून द्या, अन्यथा तुम्हांला किंवा स्वतःला चाकूने संपवून टाकेन, अशी धमकी देत या तरुणीने संपूर्ण कुटुंबाला घरातच अटकाव केला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रेणुकामाता कॉलनी येथील पीडित महिलेचा मुलगा आणि संबंधित आरोपी तरुणी यांची ओळख महाविद्यालयात झाली होती. तेव्हापासून ही तरुणी त्या मुलावर एकतर्फी प्रेम करत होती. पीडित कुटुंबाने तिला वारंवार समजावून सांगूनही तिने आपला हट्ट सोडला नाही. यापूर्वीही तिने घरासमोर येऊन आत्महत्येची धमकी दिली होती, ज्याबाबत पोलिसांत तक्रार करण्यात आली होती. गेल्या मंगळवारी दुपारी पुन्हा या तरुणीने पीडितांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला. “मला तुमच्या मुलासोबत लग्न करायचे आहे, मी इथून हलणार नाही,” असे म्हणत ती दरवाजापाशी ठाण मांडून बसली. कुटुंबाने तिला बाहेर जाण्यास सांगितले असता तिने बॅगेतील चाकूचा धाक दाखवला. “तुम्ही मला बाहेर काढले तर मी तुमच्यावर वार करीन किंवा स्वतःला इजा करून घेईन,” अशी धमकी देऊन तिने कुटुंबाला बराच वेळ घरातून बाहेर जाण्यास मज्जाव केला. काही वेळाने पुन्हा येण्याची धमकी देऊन ती निघून गेली. या धक्कादायक प्रकारानंतर पीडित कुटुंबाने कोतवाली पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली असून पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला आहे.

## 'समाधान शिबिरात' प्रशासनाचा सावळागोंधळ; २० विभागांची दांडी

तामसा (स. गांवकरी) : सामान्य जनतेच्या समस्यांचे जागीच निराकरण करण्यासाठी शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या 'समाधान शिबिरा'चा तामसा येथे गुरुवारी अक्षरशः बोजवारा उडाला. या शिबिरासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असला तरी, प्रशासकीय अनागोंदीमुळे जनतेच्या पदरी केवळ निराशाच आली आहे. ३२ पैकी तब्बल २० हून अधिक विभागांनी या शिबिराकडे पाठ फिरवल्याने आणि नियोजनातील गंभीर त्रुटींमुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तामसा येथील या शिबिराचे नियोजन तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी श्रीमती कंदकुर्ते व ग्राम महसूल अधिकारी चेके यांनी केले होते. या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार सय्यद उमर, तालुका आरोग्य अधिकारी संजय मुरमुरे, गटविकास अधिकारी अडेराघो, नायब तहसीलदार मुगाजी काकडे यांच्यासह कृषी व महसूल विभागाचे अनेक अधिकारी उपस्थित होते. मात्र, इतकी मोठी प्रशासकीय फौज उपस्थित असतानाही शिबिराचा उद्देश सफल झाला नाही. शिबिरामध्ये ३२ विभाग अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ महसूल, कृषी, अन्नपुरवठा, पंचायत समिती, आरोग्य, महावितरण, भूमी अभिलेख आणि महिला व बालविकास या आठ ते दहा विभागांनीच हजेरी लावली होती. उर्वरित २० हून अधिक विभागांचे अधिकारी व कर्मचारी गायब होते. धक्कादायक बाब म्हणजे, अनुपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांच्या जागी त्यांच्या कनिष्ठ प्रतिनिधींनी हजेरी पत्रकावर खोट्या सह्या करून शासन आणि जनतेची डोळ्यात धूळफेक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मंडप, भोजन आणि इतर व्यवस्थेसाठी शासनाचे लाखो रुपये खर्च झाले असताना, दुपारी १ ते २ वाजेच्या सुमारासच अनेक टेबल रिकामे झाल्याने लांबून आलेल्या शेतकऱ्यांना आणि मजुरांना रिकाम्या हाताने परतावे लागले.

### श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षकांच्या पथकाची मोठी कारवाई

# गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टरसह एजंट अटकेत!

श्रीरामपूर : (स. गांवकरी)



गर्भलिंग निदान चाचणी करणाऱ्या डॉक्टरविरुद्ध अप्पर पोलीस अधीक्षकांच्या पथकाने मोठी छापा कारवाई करत डॉक्टरसह एजंटला अटक केली आहे. पिंपरी निर्मळ शिवारातील एका घरात ही बेकायदेशीर गर्भलिंग निदान चाचणी सुरू असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना मिळाली होती.

माहितीनुसार, नेवासा येथील डॉक्टर भनगे हा पोर्टेबल अल्ट्रासाऊंड यंत्र चारचाकी वाहनातून आणून गरोदर महिलांची गर्भलिंग निदान चाचणी करत असल्याचे समोर आले. माहितीची खातरजमा होताच अप्पर पोलीस अधीक्षकांनी तात्काळ पथक रवाना केले. स्वतः अप्पर पोलीस अधीक्षकांसह उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर आणि पोलीस अधिकारी आठरे हेही घटनास्थळी दाखल झाले.

कारवाईपूर्वी लोणी पोलीस ठाण्यातील एका महिला कर्मचाऱ्याला बनावट गरोदर महिला म्हणून त्या ठिकाणी पाठवण्यात आले. त्यानंतर पथकाने छापा टाकला असता डॉक्टर भनगे हा त्याचा एजंट अभिजीत दिलीप भुसार याच्यासह गर्भवती महिलांची लिंग निदान चाचणी करताना रंगेहाथ आढळून आला. दोघांनाही ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या कारवाईदरम्यान घटनास्थळी एकूण आठ गर्भवती महिला आढळून आल्या. सर्व महिलांना ताब्यात घेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी सहा महिलांचे पती व कुटुंबीयांनाही पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे.

या प्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात PCPNDT कायदा तसेच महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. बेकायदेशीर गर्भलिंग निदानाविरोधातील ही कारवाई परिसरात चर्चेचा विषय ठरली असून पोलिसांनी अशा प्रकारांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

# संजीवन समाधीवर चंदन ऊटीत साकारला श्री नृसिंह अवतार

आळंदी : (स. गांवकरी)



आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे श्री नृसिंह जयंतीनिमित्त श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीवर चंदन ऊटीत भगवान श्री नृसिंह अवताराचे अत्यंत आकर्षक व लक्षवेधी स्वरूप साकारण्यात आले. या दिव्य सजावटीमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. पुणे येथील मूर्तिकार अभिजीत धोंडफळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत मेहनत, कौशल्य आणि भक्तिभावातून हा चंदन ऊटी अवतार साकारला. सूक्ष्म कलाकुसर, आकर्षक रचना आणि देखण्या सादरीकरणामुळे हा अवतार भाविकांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. या वैभवी दर्शनासाठी आळंदी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती. भाविकांनी श्रींचे दर्शन घेत भक्तिभावाने प्रार्थना केली. नृसिंह जयंतीनिमित्त मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या आगळ्यावेगळ्या चंदन ऊटी अवताराने उपस्थित भाविकांना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव दिला असून, श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील ही सजावट भक्तांसाठी विशेष आकर्षण ठरली.

# आजपासून गणोरे येथील ग्रामदैवत अंबिका मातेची यात्रात्सोव

गणोरे : (स. गांवकरी)




अकोले तालुक्यातील बहुचर्चीत गणोरे येथील ग्रामदैवत अंबिका मातेची यात्रात्सोव आज शुक्रवार दि.१ मे पासून सुरु होणार आहे. शुक्रवारी सकाळी धार्मिक विधी होणार आहे.यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अंबिका माता विश्वस्त व्यवस्थेने दिली. यात्राच्या हंगामातील आढळा परिसरातील अंबिका मातेची शेवटची मोठी यात्रा वैशाख पोर्णिमेस असते. शुकवार दि १ मे रोजी सकाळी साडे आठ वाजता मान्यवरांच्या हस्ते अंबिका माता मुखवटा चढविला जाणार आहे.यानंतर विविध ठिकाणा वरुन आलेल्या काठीची मिरवणुक, होमहवन आदी धार्मिक विधी होणार आहे. गणोरे येथे शुक्रवारी व शनिवारी रात्री ९ वाजता दोन दिवस विठाबाई भाऊ मांग यांचा लोकनाट्य तमाशा तसेच हिवरगाव आंबरे ग्रामस्थांच्या वतीनेरात्री ११ वाजता तकतराव मिरवणुक, यानंतर शोभेच्या दारुची आतिशबाजी होणार आहे. तसेच १ व २ मे रोजी भव्य सिंथेटिक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. तसेच शुक्रवारी १ मे रोजी सायंकाळी सहा ते आठ भगवान गौतम बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

# तरुणाचा लाकडी दांडक्याने व दगडाने ठेचून निर्घृण खून

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

वाकोडी ते बाबुर्डी (ता.नगर) रस्त्यावर किरकोळ शिवीगाळ तरुणाच्या जिवावर बेतली. किरकोळ वादातून दोघांनी ऊसाच्या शेतात नेले. लाकडी दांडक्याने व दगडाने ठेचून निर्घृण खून केला.

पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पोत्यात भरून ऊसाच्या शेतात फेकून दिला. ही घटना दि.२६ एप्रिल रोजी घडली. मयताच्या पत्नीने भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार दिली होती. पोलिसांनी दोन दिवसांत क्लिष्ट गुन्ह्याचा तपास करून दोघांच्या मुसक्या आवळल्या. शुभम हरी भोसले (वय- २०), समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे (वय- ४२) असे संशयित आरोपींची नावे आहेत. तर, प्रसाद रोहिदास जाधव (वय- ३९, रा. वाकोडी) असे मयताचे नाव आहे. मयत प्रसाद जाधव गेल्या दि. २६ एप्रिल रोजी दुपारी न्यू आर्ट्स कॉलेज येथे स्पर्धा परीक्षेचा पेपर देण्यासाठी जातो असे सांगून घरातून बाहेर पडले होते. मात्र, रात्र झाली तरी ते घरी न





आल्याने पत्नी अश्विनी जाधव यांनी कॅम्प पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार दिली. सहायक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर व पथकाने तपासाची चक्रे फिरवली. बुरुडगाव रोड परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन संशयित व्यक्ती आढळून आल्या. त्यानुसार पोलिसांनी दि. २९ एप्रिल रोजी पहाटे वाकोडी परिसरात 'कोंबिंग ऑपरेशन' राबवून शुभम भोसले, समाधान सोनवणे यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या दोघांना खाकीचा धाक दाखविताच ते बोलते झाले. २६ एप्रिलच्या रात्री साडेआठ वाजता बुरुडगाव ते बाबुर्डी रोडने जात असताना त्यांना रस्त्याच्या कडेला प्रसाद जाधव दिसले. जाधव यांनी आरोपींना शिवीगाळ केल्याने त्यांचा राग अनावर झाला.

त्यांनी जाधव यांना त्यांच्याच मोटारसायकलवर बसवून वाकोडी शिवारातील उसाच्या शेतात नेले. तेथे लाकडी दांडक्याने त्यांना मारहाण केली. जाधव यांनी जीव वाचवण्यासाठी उसात पळण्याचा प्रयत्न केला.

मात्र आरोपींनी लाकडी दांडक्याने व दगडाने ठेचून निर्घृण खून केला. पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपींनी मृतदेह पोत्यात भरून शेतात फेकून दिला. त्यांची मोटारसायकल सीना नदीच्या पुलाजवळील काटवनात सोडून दिली, अशी आरोपींनी कबुली दिली. याप्रकरणी अश्विनी जाधव यांच्या फिर्यादीवरून कॅम्प पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे.

# डॉ. प्रमिला इंगोले यांच्या ‘कायदे साक्षरता’ व ‘नागरी सेवा’ पुस्तकांचे प्रकाशन

### विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व कायद्याच्या ज्ञानासाठी ठरणार मार्गदर्शक

भोकर : (स. गांवकरी)



येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. प्रमिला इंगोले (गावंडे) लिखित ‘कायदे साक्षरता’ व ‘नागरी सेवा’ या दोन महत्त्वपूर्ण पुस्तकांचा प्रकाशन सोहळा मंगळवार, दि. ३० एप्रिल रोजी उत्साहात पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण यांच्या हस्ते या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

आजच्या स्पर्धात्मक युगात पदवी शिक्षणासोबतच कायद्याचे ज्ञान आणि करिअरच्या संधींची माहिती असणे अत्यावश्यक ठरले आहे. हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून डॉ. इंगोले यांनी या पुस्तकांची निर्मिती केली आहे. बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाला अनुसरून ही पुस्तके तयार करण्यात आली आहेत.

कायदे साक्षरता : सामान्यांसाठी उपयुक्त मार्गदर्शक ‘कायदे साक्षरता’ या पुस्तकात विविध कायद्यांची माहिती अत्यंत सोप्या व समजण्यासारख्या भाषेत दिली आहे. महिलांविरुद्धचे गुन्हे, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, हिंदू व मुस्लिम वैयक्तिक कायदे, एफआयआर व अटक प्रक्रिया, माहिती तंत्रज्ञान कायदा, जनहित याचिका, समान नागरी संहिता तसेच सायबर कायदा अशा महत्त्वाच्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांसाठीही उपयुक्त ठरणार आहे. नागरी सेवा : करिअरची दिशा दाखवणारे पुस्तक ‘नागरी सेवा’ हे पुस्तक १२ वी नंतरच्या करिअरविषयक संभ्रम दूर करणारे ठरेल. यात यूपीएससी, भारतीय नागरी सेवा, लोकसेवा आयोग तसेच विविध स्पर्धा परीक्षांमधील संधींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण यांच्यासह प्रा. डॉ. व्यंकट माने, प्रा. डॉ. सचिन तावडे, प्रा. डॉ. सतीश चव्हाण, प्रा. मुकुंद येगावकर, प्रा. सचिन तिवडे, प्रा. विलास गावंडे, प्रा. ओमप्रकाश कदम, प्रा. डॉ. भुसारे, प्रा. डॉ. बलखंडे, प्रा. टाके, प्रा. पंकज हाके, प्रा. श्रीमती बरदाळे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जमिनीच्या वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जमिनीच्या जुन्या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले असून, अहिल्यानगर- खडकी रस्त्यावरील अरणगाव बायपास पुलाखाली एका तरुणावर विटांनी आणि लाथाबुक्क्यांनी भीषण हल्ला करण्यात आला. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी कल्याण जिमदार काळे हे आपल्या दुचाकीवरून अहिल्यानगरहून खडकीच्या दिशेने जात होते. अरणगाव शिवारात पोहचले असता, आरोपी दीपक मुकेश भोसले याने पाठीमागून येत त्यांची दुचाकी अडवली. जुन्या जमिनीच्या कागदपत्रांच्या कारणावरून वाद उकरून काढत त्याने फिर्यादीला लाथ मारून खाली पाडले. “जमिनीचे कागदपत्र मला दे,” अशी मागणी करत दीपकने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. तसेच जवळच पडलेल्या विटकरीने त्यांच्या हातावर, पाठीवर आणि बरगडीत गंभीर दुखापत केली. यावेळी आरोपी नवनाथ मुकेश भोसले आणि शैलेश मुकेश भोसले त्या ठिकाणी आले. त्यांनीही फिर्यादीला बेदम मारहाण केली. आरोपी शैलेशने फिर्यादीच्या दुचाकीवर दगड टाकून वाहनाचे नुकसान केले आणि चावी फेकून दिली. “जर पोलिसांत तक्रार दिली तर तुला आणि तुझ्या लेकराबाळांना जिवंत सोडणार नाही,” अशी धमकी देऊन आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. या झटापटीत फिर्यादीच्या बॅगेतील महत्त्वाची कागदपत्रे गहाळ झाली आहेत. पोलिसांनी दीपक, नवनाथ आणि शैलेश भोसले यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस अंमलदार काळे करत आहेत.

# “संघर्षातून सत्तेकडे की सत्तेसाठी संघर्ष?”

(स. गांवकरी)



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे, दिव्यांग, शेतकरी आणि कष्टकरी वर्गासाठी रस्त्यावर उतरून लढणारे आमदार बच्चू कडू यांच्या नव्या पक्षप्रवेशाने राज्यातील राजकीय व सामाजिक वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. विधानपरिषद निवडणुकीच्या तोंडावर घेतलेल्या या निर्णयामुळे त्यांच्या पारंपरिक समर्थकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी, संभ्रम आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकेकाळी सत्ताधाऱ्यांविरोधात आवाज उठवणारे, मंत्रालयासमोर आंदोलन करणारे आणि अन्यायाविरोधात आक्रमक भूमिका घेणारे बच्चू कडू हे सर्वसामान्यांच्या आशेचे प्रतीक मानले जात होते. मात्र त्यांच्या नव्या राजकीय निर्णयामुळे “जनतेसाठी लढणारा नेता आता सत्तेच्या समीकरणात अडकला का?” असा सवाल जनमानसातून विचारला जात आहे. दिव्यांग संघटनांनी तीव्र प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, “आमच्या हक्कांसाठी शासनाशी दोन हात करणारा नेता जर आता सत्तेच्या राजकारणात रमला, तर आमच्या प्रश्नांचे काय?” दिव्यांगांच्या विविध संघटनांनी या निर्णयाबाबत उघड नाराजी नोंदवत बच्चू कडू यांनी आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी केली आहे. शेतकरी संघटनांमध्येही अस्वस्थता दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जमाफी, पीकविमा, नुकसानभरपाई आणि हमीभाव यांसारख्या प्रश्नांवर सातत्याने लढणाऱ्या नेतृत्वाकडून राजकीय तडजोडीची अपेक्षा नव्हती, असे अनेक शेतकरी नेत्यांनी स्पष्ट केले आहे. “ज्यांनी शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण नाकारले, तेच आता राजकीय सोयीसाठी निर्णय घेत असतील तर हा विश्वासघात आहे,” अशा भावना ग्रामीण भागातून व्यक्त होत आहेत. कष्टकरी आणि कामगार वर्गातूनही नाराजीचा सूर उमटत आहे. “सामान्य माणसाच्या संघर्षातून उभा राहिलेला नेता जर सत्तेच्या जवळ जात असेल, तर तो आमच्यापासून दूर जात आहे का?” असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर बच्चू कडू यांच्यावर टीका, व्यंग आणि ट्रोलिंगचा अक्षरशः पूर आला आहे. फेसबुक, एक्स (ट्विटर), इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर त्यांच्या निर्णयावर हजारो पोस्ट फिरत आहेत. “संघर्ष संपला की सौदा झाला?”, “जनतेचा नेता की सत्तेचा खेळाडू?”, “विचारधारा बदलली की भूमिका?” अशा टीकात्मक पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, बच्चू कडू यांचा हा निर्णय केवळ पक्षप्रवेश नसून त्यांच्या राजकीय प्रवासातील सर्वात मोठा टर्निंग





पॉइंट ठरू शकतो. त्यांच्या पारंपरिक मतदारांमध्ये निर्माण झालेली नाराजी आगामी विधानपरिषद तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर परिणाम करू शकते. विशेषतः ग्रामीण आणि वंचित मतदारांमध्ये त्याचा मोठा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. तथापि, बच्चू कडू यांनी अद्याप आपल्या निर्णयामागील राजकीय भूमिका सविस्तर मांडलेली नाही. त्यांच्या समर्थकांना आणि विरोधकांना आता त्यांच्या स्पष्टीकरणाची प्रतीक्षा आहे. मात्र एक गोष्ट स्पष्ट झाली आहे—हा पक्षप्रवेश राज्याच्या राजकारणात मोठ्या चर्चेचा विषय ठरला असून त्याचे दूरगामी परिणाम होण्याची चिन्हे आहेत. आता पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे की, बच्चू कडू आपल्या समर्थकांची नाराजी दूर करण्यात यशस्वी होतात की ही नाराजी आगामी निवडणुकांमध्ये त्यांच्या राजकीय भविष्यावर परिणाम करते. कारण महाराष्ट्राच्या राजकारणात जनतेचा विश्वास गमावणे सोपे आणि पुन्हा मिळवणे अत्यंत कठीण असते.

# थोडक्यात पण महत्वाचे



## नांदेड जिल्हा परिषदेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा परिषदेत आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, नरेगा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड यांच्यासह विविध विभागांचे खाते प्रमुख अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेवानिवृत्त ग्रामसेवक शेषेराव पाटील घोगरे यांचे निधन



नवीन नांदेड (स. गांवकरी) : वाघाळा ता.जि. नांदेड येथील जेष्ठ नागरिक तथा सेवानिवृत्त ग्रामसेवक शेषेराव नानाराव पाटील घोगरे यांचे वाघाळा येथील निवासस्थानी 30 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता दुःख निधन झाले असून मृत्यू समयी त्यांचे (वय८०) होते, त्याचा पश्चात पत्नी दोन मुले,नातवंडे असा परिवार असुन सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग नानाराव पाटील घोगरे व सदाशिव नानाराव पाटील घोगरे यांचे ते बंधू होत . त्याचा पार्थिव देहावर 1 मे रोजी सकाळी 9 वाजता वाघाळा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



## किनवट/माहूरच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर

किनवट (स. गांवकरी) : रेणुकादेवी सहकारी शिक्षक पतसंस्था मर्या, किनवट/माहूरची नूतन कार्यकारिणी निवड आज बुधवारी पार पडली. ए.आर. कार्यालयाचे निवडणूक अधिकारी जाधव यांनी अध्यक्षपदी रवि गोपालर नेम्मानिवार यांची निवड झाल्याची घोषणा केली. त्यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत उपाध्यक्षपदी जमादार सत्यनारायण किशनराव यांची, तर सचिवपदी पवार रमेश बाबाराव यांची सर्व संचालकांच्या बहुमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेवेळी शिक्षक नेते नरसिंग एंड्रलवार, संतोष दासरवार, शिवराज मुंडे, गजानन निलकंठवार, संतोष गोरठेकर, वाडगुरे, गोरठेकर तसेच संचालक संदिप तम्मडवार, सदानंद अचकुलवार, उमेश कोटरंगे, मारोती नागरगोजे, संतोष बंपलवार उपस्थित होते. याशिवाय अमोल उत्तरवार, प्रफुल्ल बनवसकर यांसह अनेक शिक्षकांनीही उपस्थिती लावली. पतसंस्थेचे कामकाज पाहणारे अविनाश दुर्गपुरोहीत यांनी संपूर्ण निवड प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पालकमंत्री अतुल सावे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी खासदार अशोक चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## स्वारातीम विद्यापीठात तुकडोजी महाराज जयंती उत्साहात साजरी



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे आज गुरुवार, दि.३० एप्रिल, २०२६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, डॉ. अनिकेत मुळे, केशव गवाळे, शिवराम लुटे, गोविंद हंबर्डे, शिवाजी चांदणे, शेख बशीर, सुधाकर शिंदे, संदीप एडके, नारायण गोरे, तुकाराम बारसे, दीपक हंबर्डे, बंकट ठाकूर, चंद्रकांत हंबर्डे,, बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## अहिल्यानगरच्या १० अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव!

मुंबई (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागामार्फत सन २०२५ या वर्षासाठी उत्कृष्ट सेवा, उल्लेखनीय कामगिरी तसेच गुणवत्तापूर्ण पोलीस सेवेसाठी पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र जाहीर करण्यात आले असून अहिल्यानगर जिल्ह्यातील १० पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश झाला आहे. या गौरवप्राप्त अधिकाऱ्यांमध्ये अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांच्यासह विविध पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश असून, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या मंजुरीनंतर हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

# ठाण्यात राज्यस्तरीय गुण गौरव सोहळा उत्साहात संपन्न

## नानजीभाई ठक्कर यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन!





ठाणे : (स. गांवकरी)

जनादेश टी.व्ही. न्यूज आयोजित राज्यस्तरीय गुण गौरव सोहळा राम गणेश गडकरी रंगायतन सभागृह, ठाणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून श्री बाळासाहेब तोरकर व डॉ. आलका नाईक उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी श्री अशरफ शानू पठाण (विरोधी पक्ष नेते, ठाणे महापालिका), ॲड. कृष्णा सुक्रे, ॲड. हायकोर्ट, श्री जितेंद्र महेता, श्री राजेश खांडेकर, श्रीमती अंजली भोईर, डॉ. स्वप्नाली कदम, डॉ. शिवानी बेनर्जी, डॉ. अंजुषा पाटील, श्रीमती माधुरी मेटांगे, श्रीमती वेदिका पाटील, श्रीमती अनीता ठाकूर, श्रीमती पल्लवी जगताप, श्रीमती पूनम माळी, श्री राजेश मोरे, श्रीमती रुचिता मोरे, श्रीमती एकता भोईर, श्रीमती यज्ञा भोईर, श्री अविनाश पाटील आणि श्रीमती प्रियंका पाटील यांची उपस्थिती लाभली.

प्रमुख पाहुणे नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, संस्कृती जपण्याची गरज आणि समाजातील सदाचार व मूल्यांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थी हे समाजाचे भविष्य असून प्रामाणिकपणा, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या बळावरच यश संपादन करता येते, असे त्यांनी सांगितले. तसेच प्रत्येकाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्या क्षेत्रात उत्कृष्टता साधावी, असे आवाहन त्यांनी केले. या सोहळ्यात के. बी. जोशी कला महाविद्यालय, एन. जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, मोतीलाल हरगोविंद विद्यालय, शिव समर्थ माध्यमिक विद्यालय, शिव समर्थ प्राथमिक विद्यालय, खडीकर क्लासेस आणि अनिकेत क्लासेस यांनी सहभाग नोंदवला. राज्यस्तरीय गुण गौरव सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून कार्यक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जाबाबत समाज कल्याणच्या सूचना

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार महाडीबीटी प्रणालीचे व्हर्जन २.०० हे आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे. नवीन प्रणालीमध्ये डेटा हस्तांतरण आणि तांत्रिक सुसूत्रता राखण्यासाठीजुन्या प्रणालीवरील प्रलंबित अर्ज निकाली काढणे अनिवार्य आहे.

सद्यस्थितीत महाडीबीटी पोर्टल वरील सर्व योजनांचे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीतील भरपूर प्रमाणात अर्ज महाविद्यालय व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येते. सर्व महाविद्यालयांनी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत, अशा विद्यार्थ्यांना संपर्क करून त्रुटीची पूर्तता करून घ्यावी. सदरील पात्र अर्ज तात्काळ या कार्यालयाचे स्तरावर पाठविण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी पूर्तता होत नसतील व जे अर्ज अपात्र आहेत असे अर्ज आपल्या स्तरावरून रिजेक्ट करण्यात यावेत. नांदेड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी आपल्या स्तरावरील सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षातील प्रलंबित अर्ज मंगळवार ५ मे २०२६ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत निकाली काढावेत तसेच सन २०२५-२६ या वर्षातील प्रलंबित अर्ज रविवार १० मे २०२६ पर्यंत निकाली काढावेत. सदरील मुदत ही अंतिम असून यानंतर सदरील अर्जावर कार्यवाही होणार नाही, याची नोंद घायवी. तारखेनंतर एकही अर्ज प्रलंबित राहिल्यास व एकही मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची राहील, असे आवाहन आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय पुणे यांनी केले आहे.

## मौजे सुगाव ( बु.) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

मुखेड : (स. गांवकरी)

मौजे सुगाव (बु) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली या जयंती सोहळ्यात सुगाव नगरीचे सरपंच, प्रतिनिधी म्हणून लाभलेले मशनाजी गंगनर, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, गावातील शिक्षक वृंद, व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सरपंच प्रतिनिधी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला.

त्यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले मारुती गायकवाड जिरगेकर , यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल छान असे विचार मांडून सर्वांची मने जिंकली तसेच बाहेरून आलेले शालेय





विद्यार्थी यांनी बाबासाहेबा बद्दल विचार प्रकट केल्याबद्दल कौतुकास पात्र ठरले आहे. जयंती मंडळाचे अध्यक्ष संतोष सोनकांबळे, व सर्व पदाधिकारी कार्यक्रमाचे आयोजन सुंदर रित्या केल्याबद्दल जयंती मंडळाकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले यादुलसाब सय्यद, प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले मारुती गायकवाड जिरगेकर, व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून लाभलेले दिगंबर फरतडे, संजय वाघमारे, गुणवंत सोलंकर, अल्लाउद्दीन सय्यद, विठ्ठल वाडीकर, संभाजी सोनकांबळे, दत्ता सोनकांबळे, मसणाजी वाघमारे, उमाकांत पांचाळ, दिलीप पांचाळ, बालाजी मोरे, हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जी वाघमारे यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता दिगंबर फनताडे यांनी केली तर जयंती सोहळ्यात काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे सहयक पोलीस निरीक्षक राजेश चव्हाण, यांनी सुरक्षा देऊन सहकार्य केल्याबद्दल जयंती मंडळाकडून त्यांच्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आला.

## राजूर ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत भाजपाचा दणदणीत विजय अक्षय देशमुख २७६ मतांनी विजयी!

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील राजूर ग्रामपंचायतच्या एका जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार अक्षय गणपत देशमुख यांनी दणदणीत विजय मिळवला. त्यांनी प्रतिस्पर्धी विठ्ठल देशमुख यांचा तब्बल २७६ मतांनी पराभव करत एकतर्फी बाजी मारली.

राजूर हे तालुक्याच्या आदिवासी भागाचे केंद्र मानले जाते तसेच आजी-माजी आमदारांचे गाव असल्याने येथील राजकीय घडामोडींना विशेष महत्त्व असते. ग्रामपंचायत सदस्य प्रमोद देशमुख यांनी राजीनामा दिल्याने प्रभाग क्रमांक एकमध्ये ही पोटनिवडणूक घेण्यात आली होती. या निवडणुकीत एकूण ६९९ मतदारांनी मतदान केले. त्यापैकी अक्षय देशमुख यांना ४८५ मते मिळाली, तर विरोधी गटाचे विठ्ठल देशमुख यांना २०९ मतांवर समाधान मानावे लागले. अक्षय



देशमुख हे माजी सरपंच गणपत देशमुख यांचे सुपुत्र असून, त्यांचे व सचिन देशमुख यांचे नाव आगामी पंचायत समिती निवडणुकीतील संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहे. सध्या राजूर ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाची सत्ता आहे. अक्षय देशमुख आणि त्यांचे बंधू सचिन देशमुख यांनी ग्रामपंचायतीतील गैरकारभार, राजूरकरांच्या समस्या आणि स्थानिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला होता. सत्तेत नसतानाही प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची पावती मतदारांनी या विजयातून दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. आगामी पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विजय देशमुख बंधूंसाठी मनोबल वाढविणारा मानला जात आहे. “या पोटनिवडणुकीत गावकीसोबत आमच्या सर्व भावकीने साथ दिली. आम्ही करत असलेल्या कामाची दखल मतदारांनी घेतली. राजूरकरांनी दाखवलेला विश्वास आम्ही सार्थ ठरवू,” अशी प्रतिक्रिया विजयी उमेदवार अक्षय देशमुख आणि त्यांचे मोठे बंधू सचिन देशमुख यांनी व्यक्त केली.

## गागलेगाव ग्रा.पं सदस्यपदी सौ. वैजाळे यांची बिनविरोध निवड

बिलोली : (स. गांवकरी)

बिलोली तालुक्यातील गागलेगाव ग्रामपंचायत येथील प्रभाग क्रमांक ०२ मधील सर्वसाधारण महिला या रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली होती. यादरम्यान सौ. रुक्मिनबाई लालू वैजाळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. ही निवड ग्रामपंचायतीच्या इतिहासातील पहिलीच बिनविरोध पोटनिवडणूक ठरली आहे. तालुक्यातील मौ. गागलेगाव येथील महिला सदस्य कै. गंगुबाई साहेबराव कामोले यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती. त्यानुसार या जागेसाठी दि. २८ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पारपडणार होती.

यासाठी दि. ७ ते १३ एप्रिल पर्यंत नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी तारीख जाहीर करण्यात आली, त्यानुसार ग्रामविकास परिवर्तन पॅनलच्या वतीने सौ. रुक्मिनबाई लालू वैजाळे,सौ. प्रतीक्षा पिराजी कमळे या दोन महिला उमेदवारांनी अर्ज दाखल केले. परंतु विरोधी पॅनलकडून एकही उमेदवारी



अर्ज न दाखल झाल्याने विद्यमान सरपंच सौ. उषाताई आनंदराव जिंके यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७ एप्रिल रोजी दोन उमेदवारा पैकी सौ. प्रतीक्षा पिराजी कमळे यांनी आपला अर्ज माघार घेतल्याने अंतिम उमेदवार म्हणून सौ. रुक्मिनबाई लालू वैजाळे यांची बिनविरोध निवड झाली आहे.असे दि. २९ एप्रिल रोजी निवडणूक अधिकारी यांनी घोषित केले आहे.

या निवडी बद्दल सौ. रुक्मिनबाई लालू वैजाळे यांचा सत्कार सोहळा सरपंच उषाताई आनंद जिंके यांच्या निवासस्थानी पारपडल, यावेळी सरपंच उषाताई जिंके, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांकडून रुक्मिणीबाई यांचा सन्मान करण्यात आला आहे.

# डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

## रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने आयोजित ‘डॉक्टर सुरक्षा अभियान’ बैठकीत मान्यवरांचा सूर

पुणे : (स. गांवकरी)

डॉक्टरांवरील वाढत्या हल्ल्यांच्या आणि खोट्या फौजदारी तक्रारींच्या पार्श्वभूमीवर रुग्ण हक्क परिषदेने ‘डॉक्टर सुरक्षा अभियान’ सुरू केले आहे. या अभियानातून राज्यभरात डॉक्टरांना सुरक्षित व न्याय्य वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी डॉक्टर, हॉस्पिटल, पोलीस, कायदेतज्ज्ञ व समाज यांच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असा सूर या अभियानाच्या बैठकीत उमटला. नवी पेठेतील पत्रकार भवनात आयोजित बैठकीमध्ये डॉक्टर, कायदे तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत यावर सविस्तर चर्चा झाली. रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक उमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत माजी सहायक पोलीस उपायुक्त भानुप्रताप बर्गे व जान महमंद पठाण, आयएमए महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे, होप हॉस्पिटलचे डॉ. अमोल देवळेकर, वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. मंदार सावजी, डॉ. उमेश टेकवडे, डॉ. प्रीती काळे, डॉ. मुकुंद संगमनेरकर, डॉ. समीर बदामी, डॉ. सागर रोकडे, डॉ. संतोष तळेकर, डॉ. कुणाल कामठे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कदम, रुग्ण हक्क परिषदेच्या पुणे शहराध्यक्षा अपर्णा साठ्ये-मारणे,





अजय विरकर आदी उपस्थित होते. भानुप्रताप बर्गे म्हणाले, “प्रत्येक क्षेत्रात चांगले-वाईट प्रकार असतात. डॉक्टरांना देवदूत मानले जाते; मात्र त्यांच्यावर संकट आल्यास त्यांना काय करावे, याचे प्रशिक्षण दिले जात नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत मार्गदर्शन करणारी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. न्यायवैद्यक साक्षरतेची प्रयत्न होणे गरजेचे आहे. डॉक्टरांना सुरक्षित वातावरण मिळण्यासाठी समाजाने एकत्रित प्रयत्न करायला हवेत." डॉ. अविनाश भोंडवे यांनी रुग्णांचे हक्क जसे मान्य आहेत, तसेच डॉक्टरांचे हक्कही महत्त्वाचे आहेत. भविष्यातील संकटांचा विचार करता सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. डॉक्टरांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडत, कोणतीही चूक होणार नाही, याची दक्षता घेणे महत्वाचे ठरते. रुग्ण आणि नातेवाईकांनीही डॉक्टरांची भूमिका समजून घेत संयमाने परिस्थितीला सामोरे जायला हवे. डॉ. अमोल देवळेकर यांनी सांगितले की, डॉक्टरांवर होणाऱ्या कारवाईत अनेकदा अन्यायकारक परिस्थिती निर्माण होते. वैद्यकीय व्यवसाय हा नोबेल प्रोफेशन असला तरी, सततच्या ताणतणावामुळे डॉक्टरांमध्ये नकारात्मकता वाढत आहे. त्यामुळे केवळ डॉक्टरांच्या नव्हे, तर संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राच्या हितासाठी मजबूत संघटना उभी राहणे आवश्यक आहे. डॉ. मंदार सावजी यांनी स्वतःवर झालेल्या खोट्या आरोपाचा अनुभव सांगत, पोलिस आणि न्यायप्रक्रियेत डॉक्टरांवर दबाव आणला जातो. योग्य मार्गदर्शन आणि कायदेशीर मदतीअभावी अनेक डॉक्टर अडचणीत सापडतात. अशावेळी एक सक्षम संस्था आवश्यक ठरते, असे नमूद केले. डॉक्टर सुरक्षा अभियान हेल्पलाइन - ९८५०००२२०४ डॉक्टरांना कोणत्याही प्रकारची समस्या, फौजदारी किंवा न्याय विषयक अडचण निर्माण झाल्यास या क्रमांकावर संपर्क साधा, असे आवाहन करण्यात आले.